

महेश पठाडे
मेरा गीत
अमर
कर दो
जगजीत सिंग

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# महेश पठाडे

लिखित

जगजीतसिंग चरित्र

# मेरा गीत अमर कर दो

# मेरा गीत अमर कर दो

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

मेरा गीत अमर कर दो(जगजीतसिंग चरित्र)

महेश पठाडे

फ्लॅट नं. 3, अनुकूल अपार्टमेंट

सावरकरनगर

गंगापूर रोड, नाशिक

मोबाइल : 8087564549

ई-मेल : rhythm00779@gmail.com

ब्लॉग : https://www.kheliyad.com/ या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २३ नोव्हेंबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# मनोगत



आता चाळिशीत असलेल्या पिढीचं महाविद्यालयीन जीवन खरोखर मंतरलेलं असं मी तरी मानतो. विशेषतः ग्रामीण भागातल्या मुलांचं तर विशेष कौतुक. कारण त्यांना सतत शहराचं औत्सुक्य असायचं. त्या वेळी स्मार्टफोन अजिबात नव्हते. रेडिओ ऐकणे, व्हिडीओ हॉलवर पिक्चर पाहणे किंवा कॅसेट आणून गाणी ऐकणे या पलीकडे दुसरं काय होतं? त्या वेळी कोपरगाव सर्किटचे टेपरेकॉर्डर कमालीचे हिट होते. थोडीशी पदरमोड करून आम्ही असाच एक असेम्बल टेपरेकॉर्डर विकत घेतला. त्याला मोठे स्पीकर. मग वेगवेगळया पिक्चरच्या कॅसेट वाजवायचो. त्या तीस रुपयांपासून मिळायच्या. पण जगजितसिंग यांच्या गझलेची कॅसेट 60 रुपयांच्या पुढेच मिळायची. मी चकित झालो. असं काय आहे या कॅसेटमध्ये? बरेच मित्र मला म्हणायचे, अरे जगजितसिंगची कॅसेट आहे. स्वस्त कशी असेल? माझ्याकडून ही कॅसेट काही खरेदी करणं झालं नाही. त्यामुळे त्यांच्याविषयीचं कुतूहल प्रचंड वाढलं.

लहानपणी दोन मुठी कोणी समोर धरल्या तर त्या मुठींमध्ये काय असेल याची उत्सुकता प्रचंड असायची. मग हळूच एक मूठ उघडून दाखवली की त्यात काहीही नसायचं. मग दुसऱ्या मुठीत काय असेल, याची उत्सुकता शिगेला पोहोचायची. मात्र ती मूठ न दाखवताच तो निघून गेला की मनात कायम सलत राहतं की काय असेल बरं त्या मुठीत? मग ती व्यक्ती जोपर्यंत भेटत नाही तोपर्यंत मनी हूरहूर कायम राहते.

माझी जगजितसिंग यांच्याविषयी जाणून घेण्याची हूरहूर अशीच त्या झाकलेल्या मुठीसारखी होती...

सहजपणे मी जगजितसिंग यांच्याविषयी एकदा आंतरजालावर वाचलं तेव्हा मला त्यांच्याविषयीची उत्सुकता वाढतच गेली. अनेक ठिकाणी त्यांच्याविषयीचे संदर्भ पाहत गेलो. वाचत गेलो. तेव्हा मला हळूहळू जगजितसिंग उकलत गेले. त्यांची गझलगायनापर्यंतची कहाणी प्रचंड संघर्षमय आहे. मी त्यांच्या अनेक मुलाखती ऐकल्या. चित्रासिंग यांनीही त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या परिवारातील, वादकांच्या चमूतील काही जणांनीही जगजितसिंग यांच्या जीवनाचे पैलू उलगडले. या सगळयांची सूत्रबद्ध मांडणी म्हणजे हे, 'मेरा गीत अमर कर दो' हे पुस्तक. गायन क्षेत्रातील त्यांनी टाकलेले पाऊल क्रांतिकारकच होते, याची प्रचीती येते.

दहा ऑक्टोबर रोजी त्यांची पुण्यतिथी झाली. त्याच वेळी ठरवलं, की जगजितसिंग आपणा सर्वांपर्यंत पोहोचवावा. माझ्या ब्लॉगवर २५ ऑक्टोबर 2019 रोजी धनत्रयोदशीला जगजितसिंग यांचा समृद्ध गझलप्रवास आठ भागांत प्रसिद्ध केला होता. तेच पुस्तकरूपाने येत आहे, याचा मला मनस्वी आनंद होत आहे. त्याबद्दल ई साहित्य प्रतिष्ठानचे खूप खूप आभार. कारण माझं हे पहिलंच पुस्तक आहे. त्याचा आनंद शब्दातीत आहे. जगजितसिंग यांच्या गझलप्रवासातील प्रत्येक भाग म्हणजे मोरपीस आहे. प्रत्येक भाग वाचताना तुमची उत्सुकता वाढत जाईल, अशी मला खात्री आहे. त्यांची ही प्रेरणादायी कहाणी तुम्हाला आवडली तर नक्की कमेंट करा. कदाचित अनेकांनी ही माहिती कुठे तरी वाचली असेलच, पण काही पैलू असेही आहेत, ते मराठी पुस्तकात अभावानेच आले असतील. त्यामुळे मराठी वाचकांसाठी हे पुस्तक आगळी पर्वणी ठरेल, अशी आशा आहे.

धन्यवाद
महेश पठाडे



महेश रंगनाथ पठाडे

माझ्या पत्रकारितेची सुरुवात 'देशदूत'च्या नाशिक आवृत्तीपासून झाली. 'देशदूत'नंतर 'सकाळ' (नाशिक व जळगाव आवृत्ती), 'दिव्य मराठी' (जळगाव आवृत्ती) असा मजल-दरमजल प्रवास करीत आता 'महाराष्ट्र टाइम्स'च्या नाशिक आवृत्तीत वरिष्ठ उपसंपादक म्हणून काम पाहत आहे. जगजीतसिंग यांच्यावरील हे माझे पहिलेच पुस्तक आहे. क्रीडा क्षेत्रातील प्रेरणादायी कथा आणि क्रीडा संस्कृतीवर सध्या लेखन सुरू आहे. ही दोन पुस्तकेही लवकरच आपल्या भेटीला येणार आहेत.


महेश पठाडे

फ्लॅट नंबर ३, अनुकूल अपार्टमेंट

सावरकरनगर, गंगापूर रोड

नाशिक

Email : rhythm00779@gmail.com

Blog : https://www.kheliyad.com/

Twitter : @PathadeMaheshMT

Linkedin : https://www.linkedin.com/in/maheshpathade03

Facebook : https://www.facebook.com/mahesh.pathade03

अर्पणपत्रिका

आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मला ज्यांची नेहमी उणीव भासते
ते माझे आईवडील

## (कै.) रंगनाथ पठाडे,

## (कै.) मंगला पठाडे

यांच्या स्मृतीस माझे लेखन समर्पित

**प्रस्तावना**

गझल गायक पद्मभूषण जगजितसिंग यांचे अकाली जाणे आजही रसिक विसरले नाहीत. त्यांनी गायलेल्या गझल /भक्तिगीते आजही करोडो भारतीयांच्या जीवनाचा अविभाज्य घटक आहेत. जीवनातील प्रत्येक विषयाला त्यांच्या गझलेने सामावून घेतले आहे. प्रत्येक मनुष्याच्या जीवनातील दुःखावर, सुखावर किंवा सद्यःस्थितीवर त्यांची गझल हळुवार फुंकर घालते. माझ्यासारख्या अनेक जगजितभक्तांचा दिवस जगजित साहेबांच्या मखमली आवाजाने सुरू होतो आणि संपूर्ण दिवस हा आवाज आमची सोबत करतो, अगदी रात्री डोळे मिटेपर्यंत...

अशा परमेश्वरी आवाजाची देणगी लाभलेल्या अवलियाचे आयुष्य रेखाटण्याचा प्रयत्न काही मोजक्याच लोकांनी केला.

यात 'बात निकलेगी तो', 'Lyric of a Legacy, Beyond time' आदी हिंदी/इंग्रजी पुस्तकांचा समावेश आहे; पण मराठीत त्यांचा जीवनपट कुणीही रेखाटला नव्हता. हे अवघड काम महाराष्ट्र टाइम्सचे वरिष्ठ उपसंपादक महेश पठाडे यांनी लीलया पेलले. आणि ब्लॉगवर ८ भागांच्या लेखनातून त्यांनी ते पूर्णत्वास नेले.

महेशजी यांनी सखोल संशोधन करून त्यांचा जीवनपट उलगडून दाखवला आहे. यामध्ये त्यांची प्रतिभा, अभ्यास आणि जगजित साहेबांसाठीचे प्रेम यांचे दर्शन होते. आठ भागांतील ही लेखमालिका जगजित साहेबांचा जीवनपट डोळयांसमोर जिवंत उभा करतो. त्यांच्या जीवनातील अनेक महत्त्वाच्या घटनांचा या लेखमालेत समावेश आहे. नवीन वाचकालादेखील जगजितसिंग यांच्यावरील ही लेखमाला संपूर्ण परिचय करून देते. भाषेवरील पकड आणि सगळया घटनांचा अनुक्रम वाचकास खिळवून ठेवणारा आहे.

ही लेखमालिका डिजिटल पुस्तकरूपात प्रसिद्ध होत असल्याने एक जगजितसिंग यांचा भक्त म्हणून मला खूप आनंद आहे. मी महेश पठाडे यांच्या या उपक्रमाला मनःपूर्वक शुभेच्छा देतो आणि संपूर्ण जगजित भक्तांकडून त्यांचे आभार मानतो.

प्रसाद गोखले

गझल गायक, नाशिक

१

# अल्लड बालपण

जगजितसिंग यांच्या गझलेचे गारूड देशातच नाही तर विदेशातील संगीतप्रेमींवरही आहे. मात्र, जगजितसिंग यांचा संगीतप्रवास तेवढा सोपा नव्हताच मुळी. जगमोहन ते जगजितसिंग हा प्रवास स्वातंत्र्याच्या पहिल्या टप्प्यापासूनचा आहे. हा काळ होता एक स्वतंत्र देश म्हणून भारताचं उभं राहणं.  म्हणजे देशातला प्रत्येक माणूस भाकरीचा चंद्र शोधण्यातच मश्गूल होता. असा तो काळ होता. अशा स्थितीत संगीतकलेचा विचार करणे शक्यच नव्हते. अशा वेळी हा कोण राजस्थानच्या गंगानगरच्या गल्लीतला तरुण, ज्याने आपल्या जादुई आवाजाने साऱ्या विश्वाला गझलेचं वेड लावलं…?

भारताला स्वातंत्र्यही मिळालेलं नव्हतं असा तो काळ. श्री गंगानगरचा एक किशोरवयीन मुलगा अमीनचंद शीख धर्मगुरूंच्या सान्निध्यात आला. कालांतराने त्याने शीख धर्म स्वीकारला. हळूहळू हिंदू धर्मातील आचरण पद्धती शीख धर्मात परावर्तित झाल्या. आता त्यांचे नाव होते सरदार अमरसिंग. दिवसभर मजुरी आणि रात्रभर शिक्षण. भाकरीसाठी जगण्याची लढाई सुरू असतानाही त्याची शिकण्याची जिद्द कौतुकास्पद होती. या मेहनतीचं अखेर चीज झालं. त्याला पोटापाण्यापुरती सरकारी नोकरी मिळाली. पहिली पोस्टिंग मिळाली बिकानेरमध्ये. तारुण्य आणि हाताशी सरकारी नोकरी. एक दिवस ट्रेनमधून गंगानगरला जात असताना समोरच्या सीटवर एक सुंदर शीख तरुणी बसली होती. दोघांमध्ये गप्पा सुरू झाल्या आणि या गप्पांमध्येच ते दोघे आयुष्यभराचे प्रवासी झाले. ही तरुणी होती बच्चनकौर. ती पंजाबमधील उट्टालन गावची रहिवासी. तिने अमरसिंगच्या जीवनात रंग भरले. अर्थात, ही कहाणी इथेच संपत नाही, तर येथून खरी सुरू होते.

## यामुळे झाले जगमोहनचे जगजितसिंग

त्यांची घरची परिस्थिती अशी, की चहावरही बंदी! अमरसिंग आणि बच्चनकौर या दोघांचा परिवार इतका वाढला, की त्यांना ११ मुले झाली. त्यापैकी चार मुलांचे निधन झाले. जी सात मुले वाचली त्यापैकी एक होता जगमोहन. त्याचा जन्म श्रीगंगानरचा- ८ फेब्रुवारी १९४१ चा. एके दिवशी वडिलांनी त्याला आपल्या नामधारी गुरूंकडे नेले. जगमोहनला पाहताच गुरू म्हणाले, “हा आपल्या गुणांनी विश्वाला जिंकेल. याचं नाव तुम्ही बदला.” आणि जगमोहनचा जगजित झाला. हाच तो जगजित, ज्याने खरोखर संपूर्ण विश्वाला आपल्या गझल गायकीने जिंकले.

अमरसिंगचा परिवार श्रीगंगानगरमध्ये राहत होता. ज्या घरात जगजितचा जन्म झाला, ते घर कुटुंबातील प्रत्येकाचं सन्मानाचं प्रतीक आहे, तर जगजितसिंग यांच्या चाहत्यांसाठी वंदनीय आहे. त्यानंतर अमरसिंग यांना सरकारी घर मिळालं आणि अमरसिंग परिवाराचं बिऱ्हाड जी-२५ क्रमांकाच्या घरात राहू लागलं. त्या वेळी जगजितसिंग यांचं वय होतं अवघं दोन वर्षे. त्या वेळी स्वातंत्र्यासाठी सुरू असलेलं आंदोलन अंतिम टप्प्यात आलं होतं. ब्रिटिशांचं भारत सोडून जाणं जवळजवळ नक्की होतं. वर्षानुवर्षांची गुलामीची जोखडं गळून पडणार होती. देशभर उत्सवाचं आणि उत्साहाचं वातावरण होतं. स्वातंत्र्य तर मिळालं; पण भारतीयांच्या काळजावर मोठा घाव बसला. तो होता फाळणीचा. गंगानगरच्या सीमेलाही त्याचा फटका बसला. या वेदना जगजितसिंगच्या गळयातून निघालेल्या गुरबानीतून बाहेर पडल्या..

“इक ओंकार सतनाम करता पुरख.. निर्मोह निर्वैर अकाल मूरत अजूनी सभम…”

जगजितच्या गळयातून बाहेर पडलेले हे भक्तिमय सूर परिवार आणि शेजारपाजार नेहमी ऐकत होता. जगजितचे बालपण आता श्रीगंगानगरच्या गल्लीबोळातून सुरू झालं. शालेय शिक्षण खालसा शाळेत झाले. शाळेची अवस्था फारशी चांगली नव्हती. जमिनीवर मांडी घालून बसावं

लागायचं. लिहायला खापराची पाटी. माध्यम उर्दूतून. घरची छोटी-मोठी कामे जगजित करायचा. विहिरीतून बादली बादली पाणी उपसून आणणे, भाजीपाला खरेदी करणे इ. घरी वीज नव्हतीच. अभ्यास मग कंदिलाच्या प्रकाशातच करावा लागायचा.

## जखमेवर आईने लावला मिरचीचा लेप!

जगजित खोडकरही तेवढाच होता. पतंग उडवणे हा त्याचा आवडता छंद. पतंग कटला, की पळत पळत तो पकडायचा हा त्याचा दिनक्रमच. एके दिवशी कटलेला पतंग हवेत हेलकावे घेत जमिनीच्या दिशेने खाली येत होता. लहानगा जगजित पतंगाचा वेध घेत उलटा जात होता. पतंग हेच त्याचं लक्ष्य. त्यामुळे मागे खाली एक कुत्रं बसलेलं होतं हे जगजितच्या काही लक्षात आलं नाही. त्याचा पाय कुत्र्यावर पडला नि कुत्र्याने जगजीतचा चावा घेतला. जगजित रडत रडत घरी गेला. आईने यावर काय करावं, तर जेथे कुत्र्याने चावा घेतला तेथे तिने पिसलेल्या लाल मिरच्या लावल्या. काय अवस्था झाली असेल चिमुकल्या जगजितची कल्पनाच न केलेली बरी. ही गोष्ट 1952 ते 54 च्या दरम्यानची. हा काळ असा होता, की त्या वेळी १-२ आण्याचा भाजीपाला मिळायचा. एक रुपयात तर आठवड्याचा भाजीपाला यायचा. अर्थात, बाजारातून भाजीपाला आणण्याची जबाबदारीही जगजित हौसेने करायचा. तो त्या रुपयातून दोन-तीन आणे वाचवायचा आणि त्यातून तो रसगुल्ला खायचा, चहा प्यायचा. मग हे महाशय घरी यायचे.

त्या काळात चित्रपटांतली गाणी जगजितला खूप आवडायची. केवळ ती गाणी शिकण्यासाठी तो चित्रपट पाहायला जायचा. अनेक वेळा फाटलेली तिकिटे जोडण्याची चलाखीही करायचा. थिएटरवाल्याला काही कळत नव्हतं. चोरूनलपून चित्रपट पाहण्याची हौस जगजित अशा पद्धतीने पुरवायचा. त्या काळात पाच आण्याला एक तिकीट असायचं.

संगीत ऐकताना जगजित एकाग्र व्हायचा. हे कसं काय व्हायचं, ते त्याचं त्यालाच माहीत नव्हतं. गुरबानी तर तो तन्मयतेने म्हणायचा. दिवसभर तो गात राहायचा. महंमद रफी, नूर

जहाँ, के. एल. सहगल आणि लता मंगेशकरांनी गायिलेली गाणी त्याला चांगलीच तोंडपाठ होती. लता मंगेशकर आणि महंमद रफी यांची गाणी तर ते आजही गुणगुणतात. ही गाणी गुणगुणताना त्यांच्या डोळ्यांसमोर आजही ते अवखळ बालपण तरळून जातं. ही गाणी म्हणजे त्यांच्या बालपणीच्या आठवणींचा ठेवा होती. आता या आठवणी धूसर होत चालल्या आहेत.

लता मंगेशकरांनी गायलेलं 'बैजू बावरा'मधील एक गाणं आजही ते गुणगुणतात...

"बचपन की मोहब्बत को दिल से ना जुदा करना
जब याद मेरी आये मिलने की दुआ करना"

एक प्रकारे संगीतकला त्यांच्या अंगात भिनली होती. त्यांचं हे संगीतप्रेम पाहूनच वडिलांनी संगीत शिक्षक छगनलाल शर्मा यांच्याशी चर्चा केली असावी. जगजितचा संगीतप्रवास इथूनच खऱ्या अर्थाने सुरू झाला. शर्मांकडून जगजितने शास्त्रीय शिक्षणाचे धडे घेतले. त्यानंतर उस्ताद जमाल खाँ यांच्याकडून ध्रुपद, ठुमरी, ख्याल आदी रागदारी शिकले. एकूणच काय, तर आईवडिलांनीच संगीत शिक्षणासाठी जगजितला प्रोत्साहित केलं. असं असलं तरी त्यांची इच्छा होती, की जगजितने आयएएस बनावं.

## शाळेत बेंच वाजवत गुणगुणायचा गाणी

खालसा स्कूलमध्ये पाचवीनंतर जगजितचं शिक्षण बेंचवर बसून सुरू झालं. सहावीत असताना बेंचलाच तबला बनवत त्यांनी सुरांची साधना केली. खालसा स्कूल जगजितच्या आयुष्यातली पहिली शाळा. याच शाळेत त्यांनी दहा वर्षे काढली. जगजितसोबत बेंचवर शेजारी दर्शनसिंग बसायचा. वार्धक्याकडे झुकलेल्या दर्शनसिंग यांनी आठवणींना उजाळा देत सांगायचे, की जेव्हा तासिका नसायची तेव्हा बेंच वाजवत जगजित सतत गुणगुणायचा.

## जगजितवर संतापले संगीत शिक्षक

जगजित जिथे संगीत शिक्षण घेत होता, तेथेच सागर शर्माही शिक्षण घेत होता. संगीत शिक्षक छगनलाल शर्मांचा हा मुलगा. सागरच्या घरात संगीताचे वातावरण होतेच. जगजितने प्राथमिक धडे त्यांच्याकडूनच गिरवले होते. एकदा छगनलाल शर्मा त्याला म्हणाले, की तू जिथे संगीत शिक्षण घेतो, तेथे सागरलाही घेऊन जात जा. मग जगजित सागरला सायकलवर बसवून संगीत शिकायला जाऊ लागला. सागर त्या वेळी तबला शिकत होता. छगनलाल शर्मा कडक शिस्तीचे. फक्त शास्त्रीय संगीत शिकवायचे. चित्रपटांतील गाणी वगैरे त्यांना अजिबात मान्य नव्हती. एकदा ते जेवण करीत होते. सागर आणि जगजित तेथूनच काही अंतरावर होते. जगजित सागरला म्हणाला, “मी गाणे म्हणतो, तू मला तबल्यावर साथ दे.” जगजितने सूर पकडले आणि सुरू झाला...‘‘तू प्यार का सागर है, तेरी एक बूँद के प्यासे हम...’’ छगनलाल शर्मांच्या कानावर हे गाणे पडताच त्यांचा संताप अनावर झाला. त्यांनी तेथून खडावा फेकून मारत, “कोण गाणं म्हणतंय? बंद करा!” सागर आणि जगजितची पुढे बोलण्याची हिंमतच झाली नाही. दोघेही चिडीचूप.

जगजित गल्लीत आला, की सर्व मित्रांना एकत्र करायचा. त्या वेळी कधी काळी सर्कस पाहिली असेल. तो सर्व मित्रांना जोकर जसा सायकलीवरच्या कसरती करायचा, तशा कसरती तो मित्रांमध्ये करून दाखवायचा. एका चाकावर सायकल चालवणे, हँडलवर बसणे इ... असा हा खोडकर जगजित.

## चॉकलेटचे आमिष दाखवून बहिणीला तानपुरा धरायला लावायचे

जगजितसिंग यांना त्यांची लहान बहीण इंदर यांनीही सुरेल साथ दिली. इंदरजित कौर सध्या बर्नालामध्ये राहतात. गाण्याची तालीम करताना जगजितला इंदरने तानपुऱ्यावर साथ दिली. अर्थात, ती तानपुराच चांगली वाजवायची असे नाही, तर तिला चांगला गळाही होता. या इंदर गालिबची गझलही छान गातात...

दिल ही तो है न संग-ओ-ख़िश्त
दर्द से भर न आये क्यों
रोएंगे हम हज़ार बार
कोई हमें सताये क्यों

इंदर लहान बहीण असल्याने जगजित त्यांना हक्काने रियाज करण्यासाठी सोबत घ्यायचे. म्हणायचे, "चल इथे बैस. हा तानपुरा छेड." आणि बैठक मारून रियाज सुरू करायचे. दोन-दोन तास हा रियाज सुरू असायचा. बाहेर मुले खेळायची. लहानग्या इंदरचे सगळे लक्ष त्या खेळणाऱ्या मुलांकडे. जगजित म्हणायचे, "थोड्यावेळ बैस. अजून थोड्याच वेळ. तुला संत्रीवाली गोळी आवडते ना...? (त्या वेळी छोट्या छोट्या संत्र्यांची चव असलेल्या गोळया तिला खूप आवडायच्या.) खूप साऱ्या आणून देईन." इंदर बिचारी गोळयांच्या आशेने तानपुरा छेडत बसून राहायची. आणि थोड्या वेळ म्हणता म्हणता हे महाशय चांगले दीड-दोन तास बसायचे. तेव्हापासून इंदर यांच्या कानाला सुरांची सवय लागली.

त्यांचे लहान बंधू कर्तारनेही संगीत शिक्षण घेतले होते.

*“कुछ ना कुछ तो जरूर होना है,सामना आज उनसे होना है”*

हे त्यांच्या आवाजातले सुरेल गीत अनेकांना आवडायचे. अशी संगीताची जाणकार असलेली सगळी भावंडे एकत्र जमली, की घरात वेगळाच माहोल व्हायचा. एकमेकांप्रती स्नेह

होता. आईवडीलही सपोर्टिंग आणि स्पोर्टिंग होते. वडिलांनाही आवड होतीच संगीताची. ते गाणे आवडीने ऐकायचे, पण ते संगीत काही शिकू शकले नाहीत. त्यामुळे त्यांना वाटायचं, की मी आपल्या एका तरी मुलाला संगीत शिकवावं. त्यामुळे गंगानगरमधील जेवढे संगीत शिक्षक होते त्या सगळयांकडे जगजितला घेऊन गेले. त्या वेळी उस्ताद जमाल खाँ यांना विनंती केली, की तुम्ही माझ्या मुलाला संगीत शिकवा.

ते म्हणाले, "मी नाही शिकवणार."

मग जगजितच्या वडिलांनी त्यांची मनधरणी केली. शेवटी ते म्हणाले, "ठीक आहे. घेऊन ये त्याला. चांगला आवाज असेल तर शिकवेन." मग ते जगजितला त्यांच्याकडे घेऊन गेले. त्यांनी जगजितला ऐकले आणि म्हणाले, "ठीक आहे. शिकवतो."

वडिलांनी जगजितला एक जुना हार्मोनिअम खरेदी करून दिला. या हार्मोनिअमवरच त्यांनी संगीत अभ्यास केला. तो आजही मोठे भाऊ जसवंतसिंग यांच्याकडे जयपूरमध्ये आहे. जसवंतसिंग जगजितवर खूप प्रेम करायचे. शिक्षणामुळे या दोन्ही भावांना वेगवेगळ्या शहरांमध्ये जावे लागले. त्यामुळे त्यांचा संपर्क थोडा कमी झाला. जसवंतसिंग यांचा आवाजही तितकाच सुरेल आहे. वय झालं तरी ते गीतांचे सूर छेडायचे...

“शिकवा ना कर गिला ना कर
ये दुनिया है प्यारे
यहाँ दम के मारे
तडपते रहे...”

जसवंतसिंग यांना जगजितचा सहवास बारा वर्षांपर्यंत होता. नंतर जसवंतसिंग यांनी शिक्षणानिमित्त पंजाबमधील पतियाळा येथे महेंद्र कॉेलेजमध्ये प्रवेश घेतला. जगजित नववीत असताना साधारणपणे १९५५-५६ मध्ये शाळेत मोठा संगीत सोहळा झाला. त्या वेळी जगजितला स्थानिक कलाकार म्हणून सादर करण्यात आले. त्या वेळी पंजाबचे दिग्गज कलाकार

या सोहळ्याला आले होते- असासिंग मस्ताना, सुरिंदर कौर, प्रकाश कौर ही त्या वेळची पंजाबच्या संगीत क्षेत्रातली दिग्गज व्यक्तिमत्त्वे होती. अशा व्यासपीठावर जगजितला संधी मिळाली. त्या वेळी त्यांनी त्यांची सर्वांत पहिली पंजाबीतली रचना सादर केली.

की तेरा एतबार ओ रहिया
उर जा लेकर रैन बसेरा
उजडे फिर संसार ये मेरा

त्याला उत्स्फूर्त दाद मिळाली. पंजाबमध्ये दाद देण्याचे दोन प्रकार आहेत. एक तर "बोले सो निहाल..." असा जयघोष केला जातो, नाही तर पैसे दिले जातात. एकेक, दोन-दोन रुपयांच्या नोटा... या गाण्यावर जगजित यांना रसिकांकडून 125 रुपये मिळाले होते. ही 1956 ची बात आहे. लोकांना गाणे आवडल्याने त्यांच्या अपेक्षा वाढल्या. म्हणाले, "आणखी एक ऐकव." जगजितची पंचाईत झाली. ते एवढंच एकमेव गाणं तयार करून आले होते. त्या काळात "बैजू बावरा" चित्रपट खूप हिट झाला होता. त्यातले एक गाणे होते, "ओ दुनिया के रखवाले..." ते जगजित यांचं या सोहळ्यातलं स्टेजवर सादर केलेलं दुसरं गाणं. एकूणच जगजित यांचा हा पहिलाच यशस्वी लाइव्ह स्टेज शो ठरला. यश काय असतं, टाळ्या काय असतात हे जगजित यांनी या सोहळ्यातून पहिल्यांदाच अनुभवलं.



२

# वो छोटीसी राते, वो लम्बी कहानी

याच 1956 च्या काळात जगजित यांना तारुण्याचे संकेत मिळू लागले. अनेक तरुणी त्यांचा कानोसा घेऊ लागल्याचे त्यांना जाणवू लागले. कदाचित ही त्यांच्या सुरेल गायकीची पावतीच म्हणावी लागेल. एका मुलीने तर त्यांना फारच त्रासून सोडले. कारण ते जेव्हा तिच्या घरासमोरून सायकलवर जायचे, तेव्हा नेमकी त्यांची सायकल पंक्चर व्हायची. त्यामुळे त्यांना तिथे थांबावे लागायचे. मग पंक्चरवाल्याला बोलवा. पंक्चर काढेपर्यंत जगजितला ती मुलगी खिडकीतून एकसारखी न्याहाळायची. जगजितला यातलं काहीच माहीत नव्हतं. खूप नंतर त्यांना कळलं, की ती रस्त्यावर चुका पेरून ठेवायची. हेतू हाच, की जगजित यांची सायकल त्यामुळे पंक्चर व्हावी आणि जगजितला तेथे थांबावे लागावे. एकदा तिची ही चलाखी तिच्याच वडिलांनी पकडली.

गंगानगरमध्ये जगजित यांचं शिक्षण पूर्ण झालं. आता त्यांना पुढचं शिक्षण घ्यायचं होतं. त्यांचे मोठे भाऊ जसवंतसिंग म्हणाले, की तुला संगीतात रुची आहे. त्यामुळे तू जालंधरला शिक्षण घेतले पाहिजे. तेथे आकाशवाणी केंद्र असल्याने तुला कदाचित तेथे संधी मिळू शकेल. त्यामुळे जगजितने जालंधरमधील डीएव्ही कॉलेजमध्ये बी.एस्सी.ला प्रवेश घेतला. त्यामुळे झालं काय, की शिक्षणाचे तीनतेरा वाजले आणि संगीताची नशा परमोच्च स्थानी पोहोचली! होस्टेलमध्ये राहत असल्याने रियाज करण्यास स्वातंत्र्य बेसुमार! पहाटे पाचपासून रियाज सुरू व्हायचा. त्यामुळे त्यांच्या खोलीजवळ राहण्यास अन्य विद्यार्थी तयार होईनात. सायंकाळपर्यंत रियाज संपत नव्हता. होस्टेलवर जो कोणी विद्यार्थी भेटेल, त्याला पकडून गाणे ऐकवण्याचा प्रयत्न जगजित करीत होता. त्यामुळे जगजितपासून बचाव करण्याचा प्रत्येक जण प्रयत्न करायचा.

ते म्हणायचे, "अरे भाऊ, तुला तर पास व्हायचे नाही, आम्हाला तर शिकू दे..."

त्या वेळी जगजित गमतीने म्हणायचा, "तुम्ही आज मला ऐकत नाही; पण एक वेळ अशी येईल, की मला ऐकण्यासाठी तुम्हाला पैसे मोजायला लागतील."

(2009 मध्ये जगजित यांचे जालंधरला जाणे झाले, तेव्हा त्यांना तेथे शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी इतका मानसन्मान दिला, की जगजितसिंग भरून पावले. त्या वेळी ते ज्या होस्टेलमध्ये रूम नं. 98 मध्ये राहिले, त्या रूमलाही त्यांनी भेट दिली होती.)

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच जगजितने जालंधर आकाशवाणी केंद्रात ऑडिशन दिली. शास्त्रीय संगीत परीक्षेत तर ते पास झाले; पण उपशास्त्रीय संगीतात ते नापास झाले. अर्थात, यातही ते समाधानी होते. कारण त्याला बी श्रेणीचा दर्जा मिळाला. यामुळे आकाशवाणीवर वर्षातून सहा वेळा ते गाऊ शकत होते, तर एकदा त्यांचे लाइव्ह प्रसारण होणार होते. त्याच्यासाठी हेच खूप होते. जालंधर येणे एक प्रकारे सार्थकी लागले होते. नंतर जगजित यांनी उपशास्त्रीय परीक्षाही उत्तीर्ण केली. आता तर आकाशवाणी केंद्राने संगीत विभागाचा कायापालट केला आहे. आजही तेथे जगजित भेट देतात तेव्हा भावूक होतात. त्या वेळी जगजित यांच्यासोबत सुरेंद्र दत्ता असायचे. ते खूप सुंदर सतारवादन करायचे. या संगीतवेडापायी जगजित यांचे शिक्षणाकडे कमालीचे दुर्लक्ष झाले. ना त्यांनी लेक्चर अटेंड केले, ना लॅबमध्ये प्रॅक्टिकल. विज्ञान शाखेचं असं शिक्षण तर कधी नसतंच मुळी. परिणामी, बी.एस्सी.च्या प्रत्येक वर्षासाठी त्यांनी दोन वर्षे घेतली. याच काळात त्यांनी विद्यापीठाच्या युवा स्पर्धेत कॉलेजचे प्रतिनिधित्व केलं. या स्पर्धेत त्यांचं एक गीत प्रचंड लोकप्रिय झालं. ही 1959-60 मधील गोष्ट आहे. त्या वेळी यूथ फेस्टिव्हलचं विद्यार्थ्यांवर गारूड होतं. म्हणजे आधी महाविद्यालयीन स्तरावर स्पर्धा होते, नंतर विद्यापीठ स्तरावर आणि नंतर आंतरविद्यापीठ स्तरावर. त्यामुळे सर्व विद्यार्थी या स्पर्धेच्या तयारीला लागायचे. जगजित या स्पर्धेत लाइट म्युझिकमध्ये विद्यापीठाचं प्रतिनिधित्व करायचे.

त्या वेळी त्यांनी सादर केलेल्या गीताने विद्यार्थ्यांना भयंकर वेड लावले. आजही त्यांचे क्लासमेट त्यांना न्यूयॉर्क किंवा कुठेही भेटले, की या गीताची डिमांड होते. ते गीत होते...



रुख़ से परदा उठा दे ज़रा साक़िया
बस अभी रंग-ए-महफ़िल बदल जायेगा
है जो बेहोश वो होश में आयेगा
गिरनेवाला है जो वो संभल जायेगा

तो साधारण 1962 चा काळ होता, ज्या वेळी तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद कॉलेजच्या वार्षिक महोत्सवास आले होते. जगजितवर स्वागतगीत सादर करण्याची जबाबदारी होती. रेडिओवर एक शायर जगजितचे मित्र झाले होते. त्यांच्याकडून स्वागतगीत लिहून घेतले. हे स्वागतगीत असे होते...

स्वागतम् स्वागतम्
करते है हम
अपने मेहमान को
प्रणाम करते है हम

हे शायर होते सुदर्शन फाकिर. फाकिर यांच्या गझलांचे गायन नंतर जगजित यांनी अनेकदा केले. रसिकांनी त्या गझला ऐकल्या असतीलच. त्यापैकी एक नज्म तर कुणी ऐकली नाही असं कधी होणार नाही...

मुहल्ले की सबसे पुरानी निशानी
वो बुढ़िया जिसे बच्चे कहते थे नानी
वो नानी की बातों में परियों का डेरा

वो चेहरे की झुरियों में सदियों का फेरा
भुलाए नहीं भूल सकता है कोई
वो छोटी सी रातें वो लम्बी कहानी

कसाबसा जगजित ग्रॅज्युएट झाला. मग घरातून अधिकारी बनण्याचा दबाव वाढला. त्यामुळे एम.ए. इतिहास विषयात करण्याचा इरादा पक्का केला आणि कुरुक्षेत्र विद्यापीठात प्रवेश घेतला. दोन वर्षे कशीबशी काढली. मन काही रमत नव्हतं. जगजितने एकदा तर मनात खूणगाठ बांधली, की संगीतच आपलं आयुष्य आहे. तो 1961 चा काळ होता. एक दिवस त्यांना शिमल्यातील एका कार्यक्रमाचे निमंत्रण मिळाले. त्या वेळी त्यांचे गाणे ऐकले लोकप्रिय अभिनेता ओम प्रकाश यांनी. त्यांनी त्याला मुंबईत येण्याचे आमंत्रण दिले. जगजितला तर आकाश चार बोटेच राहिली जणू. एवढा मोठा अभिनेता मुंबईला बोलवतोय म्हंटल्यावर जगजितने शिक्षणच सोडून दिले आणि दाखल झाले मुंबईत. घरी कोणालाही सांगितले नाही. मुंबईत ते अभिनेता ओम प्रकाश यांना भेटले. त्यांनी मदतही केली. मदन मोहन, जयदेव आणि शंकर जयकिसन यांची भेट घालून दिली. पुन्हा एकदा जगजित यांना स्वरपरीक्षणाला सामोरे जावे लागले; पण तिथे जगजितची डाळ काही शिजली नाही. एक खडकू खिशात राहिलं नाही. वडिलांना पैशांसाठी तार केली; पण पत्ता लिहिणेच विसरले. अखेर पराभूत मनाने ट्रेनच्या शौचालयात लपून ते विनातिकीट प्रवास करीत जालंधरमध्ये परतले. मात्र, मन अजूनही मुंबईच्या मायानगरीतच अडकलं होतं. दिवस-रात्र मुंबईचे स्वप्न पडायचे. कशीबशी तीन- चार वर्षे काढली आणि हे महाशय पुन्हा मुंबईत आले. या वेळी त्यांना नशीबही साथ देत होते. मायानगरी कोणावरही मेहेरबान होत नाही. ती त्यालाच प्रसन्न होते, ज्याच्या आत काही तरी आहे. या वेळी जगजित झोळी भरून घेऊन गेले आपल्या कौशल्याच्या जोरावर.

३

# गझलेने बदलला चेहरामोहरा

वडील निवृत्त झाले होते. संपूर्ण कुटुंब लुधियानात येऊन राहू लागलं. घरची परिस्थिती खालावत चालली होती. अशा परिस्थितीत वडिलांकडून काय मागणार...? या वेळी हरदमनसिंग भोगल जणू काही देवदूत म्हणून आले. भोगल सायकलींचा व्यापार करीत होते. ते म्हणाले, "जगजित तू तुझे स्वप्न पूर्ण कर. दर महिन्याला मनीऑर्डर मी पाठवेन. पैशांमुळे तुला परत यावं लागणार नाही. बस तू तुझं कौशल्य दाखव."

या दिलाशाने जगजितच्या डोळयांत आनंदाश्रू चमकले. ते मनात म्हणाले, "आयुष्यात कोणीच देव पाहिला नाही, पण देवाचे रूप असेल तर ते भोगलमध्ये आहे." पुन्हा एकदा जगजितने कोणालाही न सांगता पठाणकोट एक्स्प्रेस पकडली. 19 मार्च 1965 चा तो दिवस होता. ही गाडी तीन दिवसांनी मुंबईला पोहोचायची. मुंबईत पोहोचल्यानंतर हरदमनने सहा-सात महिने 200 रुपये प्रतिमहिना पाठवले. घरात कोणालाच माहीत नव्हतं, की या वेळी गेलेला जगजित खरोखर जगाला जिंकण्यासाठी गेला आहे. घरच्यांना कोणालाच जगजित कुठे गेला हे माहीत नव्हतं. फक्त हरदमनला माहीत होत. अखेर महिनाभरानंतर जगजितची चिठ्ठी आल्यावर घरच्यांना कळलं, की जगजित मुंबईला गेला आहे. कुरुक्षेत्र विद्यापीठात होस्टेलमध्ये राहत असताना जगजित दर आठवड्याला शनिवारी- रविवारी घरी यायचा आणि सोमवारी परत होस्टेलवर परतायचा. नंतर तीन आठवडे झाले तरी जगजित घरी आला नाही, म्हणून वडिलांनी दुसऱ्या मुलाला सांगितले, की त्या भोगलला विचार बरं, का आला नाही जगजित? भोगलला विचारले तर त्याने सांगितले, की अरे, तो तर मुंबईला गेला आहे. त्याने कोणाला सांगायला लावले नाही. तूही कोणाला सांगू

नकोस. भावाने कोणाला सांगितले नाही आणि महिनाभरानंतर जगजितची चिठ्ठी आल्यानंतर नेमका काय तो उलगडा झालाच.

सुरुवातीच्या काळात जगजित मुंबईत एल्फिन्स्टन रोडवरील गोप हाऊसमध्ये राहत होता. त्या वेळी ते खूपच स्वस्त होतं. रोज सकाळी चर्चगेटसाठी लोकल पकडावी लागायची. दिवसभर इकडेतिकडे धावपळ सुरू असायची. थकूनभागून आल्यानंतर रात्री अंथरुणावर अंग टाकून द्यायचं, असा त्याचा नित्यक्रम. काही दिवसांनंतर गोप हाऊसमधूनही एक प्रकारे जगजितची हकालपट्टीच झाली. गरिबाचा कोणी वाली नसतो असं म्हणतात. त्याचा प्रत्यय आला.

एकदा रूमवर जगजित परतला तर सामान बाहेर पडलेलं. जगजित चकित झाला. अरे हे काय झालं? त्याने त्याच्या पार्टनरचा शोध घेतला, तर त्याचा रूम पार्टनर रात्री साडेदहा वाजता आला.

जगजित म्हणाला, "अरे माझं सामान बाहेर कसं काय?"

तर तो म्हणाला, "सामान तर माझंही बाहेर आहे. मी तुझ्यासाठी इथं आलोय. मी ही रूम सोडलीय." मग जगजितला कळलं, की तोही एक भाडेकरू होता, ज्याने आपल्यालाच पोटभाडेकरू म्हणून ठेवलं; पण मूळ मालक वेगळाच होता!

नंतर जगजितसह तो आग्रीपाडा भागातील शेर-ए-पंजाब होस्टेलमध्ये राहायला आला. त्या वेळी 35 रुपये भाडे होते. दोघांनी मिळून ते भरण्याचा निर्णय घेतला. नंतर तोही दुसरीकडे निघून गेला. कारण तो नोकरी करीत होता. जगजित मात्र आणखी दोन-तीन वर्षे तिथेच राहिला. तेथे सुविधा अशा होत्या, की कुठेही बाहेर जाण्याची गरज पडत नव्हती. चहा मागवायचा असेल, तर वरतूनच आवाज द्यायचा, "अरे दो कप चाय भेज.." चहा यायचा. थाली भेज, तर थाळी यायची. कदाचित ताजमध्ये वेळ लागेल, पण शेर-ए-पंजाबमध्ये पटापट सर्व्हिस मिळायची. याच दिवसांत जगजितला भेटले सुभाष घई. सुभाषला हिरो बनायचे होते, तर जगजितला गायक.

दोघेही स्वप्नांचे गाठोडे उराशी घेऊन फिरत होते. सुभाष घईंना अजूनही हा संघर्षमय प्रवास आठवत असेल.

सुभाष घई जगजितसिंग यांना पंजाब विद्यापीठापासून ओळखत होते. पंजाब विद्यापीठात सुभाषची अभिनयकला लोकप्रिय होती. त्या वेळी जगजित डीएव्ही कॉलेजकडून शास्त्रीय संगीत स्पर्धेसाठी यायचा. त्या वेळी जगजितने अनेक पुरस्कार जिंकले होते. तिथूनच सुभाष आणि जगजितच्या मैत्रीचे धागे घट्ट झाले. त्यानंतर अचानक सुभाष मुंबईत जगजितला भेटला. सुभाष चकित. जगजितला म्हणाला, "अरे तू इथे कसा?""

"मी गायक बनण्यासाठी इथे आलोय." - जगजितसिंग

"अरे वाह, मीही इथं अभिनेता बनण्यासाठी आलोय." - सुभाष

मग काय, निघाले दोघे संघर्षाचा अध्याय रचायला. कालांतराने हे दोघे आठवड्यातून दोनदा मरीनलाइन्स, मरीनड्राइव्हला भेटू लागले. दोघेही आपल्या दुखभऱ्या कहाण्या सांगत होते.

तेथे जगजितला आणखी एक देवदूत लाभला. ते म्हणजे बेरी हॉटेलचे मालक बेरी. तरुणांचे ते मदतगार. बऱ्याचदा मोफत जेवण द्यायचे, चहा पाजायचे आणि जगजितसाठी संधीही शोधायचे. आजच्या जमान्यात असे लोक कुठे मिळतात हो.. त्यांनी काही हॉटेलांमध्ये व काही मैफलींमध्ये गायनाची संधी दिली. पैसेबैसे काही मिळत नव्हते, पण रात्रीचं जेवण मिळायचं आणि काही मोठी लोकं जगजित यांचं गाणं ऐकायचे. जगजितला वाटायचं, की कदाचित कुणाला तरी गाणं आवडो आणि लॉटरी लागो. जगजित हिंदी चित्रपटांतील लोकप्रिय गाणे गायचा, पंजाबी टप्पे आणि मागणीप्रमाणे गीतेही सादर करायचे. अगदी श्रीमंतांच्या पार्टीतही ते गाणे गाण्यासाठी जायचे. चार पैसे तरी मिळायचे. लोकं जगजितच्या गाण्यावर अक्षरशः थिरकायचे. जगजित बिझी झाला, पण दिल्ली अजूनही दूर होती.

त्या काळात जगजितने थ्री पिस सूट शिवला होता. तो परिधान करून रोज गाणे गायचे. या आठवणी ते महेश भटसोबत शेअर करायचे. महेश भट प्रोत्साहनही द्यायचे. महेश भट म्हणायचे, जगजित, त्या काळात मैफिलींमध्ये गायचे. थोडे फार पैसे मिळायचे. त्यात त्यांचा उदरनिर्वाह व्हायचा. ते मला म्हणायचे, की मी मुंडण सेरेमनीतही गायचो!

सुभाष घई तर ॲक्टिंग करण्यासाठी आले होते; पण ॲक्टिंगचा रोल मिळाला जगजितसिंग यांना. त्या वेळी 1967 मध्ये "अमन" नावाचा चित्रपट आला होता. त्यात हिरो होते राजेंद्र कुमार. या चित्रपटात त्यांचा एक सरदार दोस्त होता. तो सरदार दोस्त म्हणजे जगजितसिंग. नंतर जेव्हा कधी जगजितसिंग स्वतःची ॲक्टिंग पाहतात तेव्हा त्यांना हसू आवरत नसायचं. मनात म्हणायचे, बरं झालो ॲक्टर झालो नाही ते. या चित्रपटात जगजितसिंग राजेंद्र कुमारला "ओ जियो पापेजी" असे ओरडत त्याला उचलून घेतो आणि थोडासा संवाद आहे...

जगजितसिंग यांची गाडी हळूहळू दौडायला लागली होती. नव्या गायकांमध्ये लोक जगजित यांच्या नावाची चर्चाही करू लागले होते. त्यांना ते छान वाटायचं; पण आतून बेचैन व्हायचे. कधी ब्रेक मिळेल, याची चिंता त्यांना सतावत होती.

एक दिवस अशीच काहीशी सुरुवात झाली. 1966 मध्ये एचएमव्ही कंपनीचे आमंत्रण मिळाले. त्या काळात गाण्यांचे रेकॉर्ड निघायचे. त्याला काळा तवा म्हणायचे. कंपनीने सांगितले, की आम्ही तुझ्या दोन गझलांची ईपी काढू. ईपीमध्ये एका बाजूने किमान दहा मिनिटे रेकॉर्डिंग व्हायचे. म्हणजे दोन गझला. रेकॉर्डिंग झाले. त्यांनी कव्हरवर छापण्यासाठी त्यांना जगजितसिंग यांचा एक फोटो हवा होता. सगळ्यांनी सांगितलं, की पगडी, संगीत आणि दाढी यात मोठा विरोधाभास आहे. जर तू सफाचट झाला तर अधिक चांगलं वाटेल. आता ही गोष्ट जगजित वडिलांना तर सांगू शकत नव्हते; पण मोठ्या भावाला माफी मागून चिठ्ठी लिहिली, की "आता

मी शीखरूपात तुम्हाला दिसणार नाही" 9 जानेवारी 1966 रोजी हे अंतर्देशीय पत्र लिहिले होते. त्यात लिहिले होते, मी आता मुंबईत राहण्याचा निर्णय घेतला आहे. इथले लोक शीख व्यक्तीला आर्टिस्ट म्हणून स्वीकार करीत नाहीत. त्यामुळे पगडी-दाढीपासून मुक्ती आवश्यक आहे.

जेव्हा जगजितसिंग नव्या रूपात आले तेव्हा त्यांनी मोठ्या भावाला पुन्हा एक अंतर्देशीय पत्र लिहिलं. त्यात लिहिले, की मी माझी चूक मान्य केली. वडील तर खूप दिवस जगजितसिंग यांच्यावर नाराज होते. त्यांनी तर बोलणेच सोडले होते. जगजित यांचे मोठे भाऊ जसवंतसिंग यांनी ही आठवण सांगितली.

"वडील लोकांना सांगायचे, की आपण एक चांगला शीख बनून राहायला हवं. शब्दकीर्तन, गुरूग्रंथमध्ये विश्वास ठेवायला पाहिजे. शीख धर्म सोडला नाही पाहिजे. हे ते दुसऱ्यांना सांगायचे. नंतर त्यांना कळलं, की आपल्याच मुलाने बट्टा लावला तर ते तीन दिवस घरातून बाहेर निघाले नाही. त्यांना वाटायचं, की लोक काय म्हणतील? पण नोकरी होती म्हणून येणं-जाणं तर होणारच होतं. बाहेर पडायलाच हवं. जे काही झालं ते त्यांनी स्वीकारलं, पण सद्मा तर मोठा बसला होता"

जेव्हा जगजितसिंग यांचा चेहरा रेकॉर्डवर प्रसिद्ध झाला तेव्हा लोकांनी ओळखलंच नाही. फेब्रुवारी 1966 मध्ये हा रेकॉर्ड मार्केटमध्ये आला. तो इतका हिट झाला, की त्याच्या पाच हजार प्रती विकल्या गेल्या. एचएमव्हीवाले तर थक्क झाले. त्यात जगजितसिंग यांनी एक गझल मुकेशची कॉपी करून गायिली, तर दुसरी स्वतःच्या खास शैलीत.

अपना गम भूल गये
तेरी जफा भूल गये
हम तो हर बात
मोहब्बत के सिवा भूल गये

ही या रेकॉर्डमधील पहिली गझलस जी मुकेशच्या शैलीत गायली. दुसरी गझल खास जगजितसिंगह यांनी यांच्या शैलीत होती, ती गझल होती...

आंख को जाम समझ बैठा था अंजाने में
साकिया होश कहां था तेरे दिवाने में…

ही रेकॉर्ड विकली गेल्याने जगजितसिंग यांची बल्ले बल्ले झाली; पण संभ्रम हा होता, की कोणामुळे ही रेकॉर्ड विकली गेली? कारण त्याच्या दुसऱ्या बाजूला सुरेश राजवंशीच्याही आवाजातील दोन गझला होत्या; पण यामुळे जगजितसिंग यांना एक फायदा झाला, की या मायानगरीत आता ते अनोळखी राहिले नाहीत. याच काळात जगजित यांना रेडिओ सिलॉनवाल्यांनी रेकॉर्ड केले. त्या काळात रेडिओ सिलॉनमध्ये संधी मिळणे खूप मोठी गोष्ट होती. जगजितसिंग यांचं 5 फेब्रुवारी 1966 च्या रात्री आठ वाजता फुलवारीमध्ये पहिल्यांदाच गाणं लागलं होतं.

(रेडिओ सिलॉनची एक टॅगलाइन वाजायची. 60 च्या दशकातील पिढीला ती चांगली ठाऊक असेल...

आपका पुराना साथी रेडिओ सिलॉन…)

४

# पहिला ब्रेक

आंख को जाम समझ बैठा था अंजाने में
साकिया होश कहाँ था तेरे दिवाने में...

रात्रभर जगजितसिंग यांच्या मनात हे गीत रुंजी घालत होतं. स्टार बनण्याचे स्वप्न आता बाळसं धरत होतं. 1968 मध्ये जगजित यांना गुजराती चित्रपट 'बहुरूपी'मध्ये गायनाची संधी मिळाली.

राम नाम की पावन बन्सी
राम मिलन मे काज हे मनवा...

याच काळात त्यांची मैत्री राजेंद्र मेहतांशी झाली. होय, हेच ते राजेंद्र मेहता ज्यांनी निना यांच्याशी जोडी बनवली आणि त्यांनी सुरेख गझला लोकांपर्यंत पोहोचवल्या.

चित्रपटसृष्टीत कोणाची कोणत्या टप्प्यावर ओळख होईल हे सांगता येत नाही. राजेंद्र मेहता यांची ओळखही जगजितसिंग यांना तशी सरप्राइजच होती. राजेंद्र आणि जगजितसिंग हे एकमेकांना भेटले ते मनमोहन किशन यांच्या घरी. राजेंद्र मेहता किंग सर्कलवर राहायचे. त्या वेळी त्यांच्या घरी कार्यक्रम होता. कार्यक्रमानंतर मनमोहन किशन यांनी राजेंद्र यांना एक मेसेज पाठवला, की कोणी एक मुलगा बिकानेरहून आलाय. खरं तर तो पंजाबी सरदार आहे लुधियानाचा, पण तो तुझ्याबद्दल विचारत होता. मी त्याला तुझा पत्ता दिला.

एक दिवस बिल्डिंगखाली राजेंद्र आणि मनमोहन किशन उभे होते. त्याच वेळी जगजितसिंग त्यांना तिथे भेटले.

राजेंद्र म्हणाले, "तुम्ही जगजितसिंग आहात का?"

तो म्हणाला, "हो. तुम्ही राजेंदर का?"

"हो?"

जगजितसिंग म्हणाले, "मी शेर-ए-पंजाबमध्ये राहतोय. मला जालंधरमध्ये तुमच्याविषयी सांगितलं होतं. मला बिकानेरमध्येही काही लोकांनी तुमच्याविषयी सांगितलं होतं."

ही ओळख जगजितसिंग यांच्यासाठी महत्त्वपूर्ण ठरली. त्यानंतर जगजितसिंग यांचं राजेंद्र यांच्याकडे येणं-जाणं सुरू झालं. जगजित राहत होते तेथे इतरही अनेक जण होते. राजेंद्रही पेइंग गेस्ट म्हणूनच राहत होते. त्यांचं घरही वैशिष्ट्यपूर्ण होतं. म्हणजे इनमिन दोन खोल्यांचं घर. एका खोलीत किचन बनवलेलं होतं, तर दुसरी खोली संगीत मैफलींचं. जगजितसिंग यांचाही हळूहळू संगीत ग्रुप छान जमत होता. त्यांच्यासोबत दोन मुले होती- नारायण आणि गोविंद. ते तबला वाजवायचे.

राजेंद्र मेहतांचा एक रेकॉर्ड जगजितसिंग यांच्या मदतीने निघाला होता. राजेंद्र यांनी गझल गायल्या, तर जगजित यांनी संगीत दिलं होतं. हापण एक ईपी होता आणि तो एचएमव्हीनेही काढला होता. 1967 चा तो काळ. एक संगीतकार म्हणून जगजितसिंग य़ांचा हा पहिला रेकॉर्ड होता.

## असा सुरू झाला चित्रा यांचा गायनकलेतला प्रवास

कंपनी आता जगजित यांच्या कामावर बेहद खूश होती. 1969 मध्ये त्यांनी जगजितसिंग यांचे आणखी दोन रेकॉर्ड काढले. ते लोकांना खूप आवडले. याच काळात जगजित यांची ओळख

झाली देबू प्रसाद दत्ता यांच्याशी. ते दक्षिण मुंबईत राहायचे. ते एका बिस्कीट कंपनीत मॅनेजर होते, पण जाणते संगीतप्रेमीही होते. संगीत रेकॉर्डिंगचे नवनवे तंत्रज्ञान त्यांना माहीत होते. त्यांनी त्यांच्या ड्रॉइंग रूममध्ये स्टुडिओ बनवला होता आणि मोठमोठे लोक- जसे श्याम बेनेगल, वनराज भाटिया, मृणाल सेन, सुलक्षणा पंडित अशी अनेक दिग्गज मंडळी रेकॉर्डिंगसाठी त्यांच्याजवळ येत होती. त्यांची पत्नी रेडिओवर जिंगल गायची. इतका गोड आवाज होता, की जगजित दंग होऊन जायचे. त्यांना 'जिंगल क्वीन?' म्हंटलं जायचं. तो आवाज जगजित यांच्या मनात इतका कोरला गेला, की त्या आवाजाने त्यांचं आयुष्यच बदलून टाकलं.

या जिंगल क्वीन दुसऱ्यातिसऱ्या कोणी नाही तर चित्रा होत्या. याच चित्रा पुढे जगजितसिंग यांच्या अर्धांगिनी झाल्या. तीही वेगळीच प्रेमकहाणी आहे. मात्र, पहिल्याच भेटीत जगजित यांचा आवाज त्यांना अजिबात आवडला नाही. त्यांच्यासोबत गायलाही त्यांनी स्पष्ट नकार दिला होता.

चित्रा मूळच्या कलकत्त्याच्या. तिथेच जन्म झाला आणि तिथेच शिक्षण. चित्रा यांची आई शास्त्रीय संगीताच्या चांगल्या जाणकार होत्या. आई रियाज करायची, तर चित्रा शांतपणे ऐकत राहायची. कोणतेही शिक्षण न घेता संगीत चित्राच्या नसानसांमध्ये भिनलं. वयाच्या पाचव्या वर्षीच चित्रा ऑल इंडिया रेडिओवर 'रवींद्र संगीत' गाऊ लागली होती. ऐकणारे चकित व्हायचे. मात्र, त्याचं उमलत्या वयातच म्हणजे वयाच्या 14-15 व्या वर्षीच घरच्यांनी लग्न लावलं. लग्नानंतर त्या बंगालहून महाराष्ट्रात आल्या. पती मुंबईत राहायचे म्हणून चित्राचे नवे बस्तान मायानगरीत झाले. एक वर्षानंतर वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षीच त्यांनी एका गोंडस मुलीला (मोनिका) जन्म दिला.

चित्राचे पती देबू दत्ता संगीताचे खूप शौकीन होते. त्यांना चित्रा यांच्या गायनाबद्दल माहिती होती. म्हणून त्यांनी कधीच गायनापासून त्यांना रोखलं नाही. त्यांच्या घरासमोर एक गुजराती परिवार राहत होता. हा परिवारही संगीतप्रेमी होता. अनेकदा त्यांच्या घरी

संगीतमैफली व्हायच्या. तेथे एका शिक्षकाकडून चित्रा यांनी तीन महिने संगीत शिक्षण घेतले. त्यानंतर संगीतकार वैद्यनाथन यांच्याशी ओळख झाली. त्यांनी रेडिओवर जिंगल्स गायनाची संधी दिली आणि पाहता पाहता चित्रा 'जिंगल स्टार' झाल्या.

चित्रा तशा जिंगल गायनात अपघातानेच आल्या. त्या वेळी रेडिओवर लक्ष्मी शंकर गाणार होत्या. त्या हिंदी, तसेच अन्य भाषांतही गायच्या. त्या काळातल्या त्या हुकमी गायिका होत्या. बैद्यनाथनशी चित्रा यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. त्या वेळी लक्ष्मी शंकर आजारी पडल्या की काही तरी अडचणी आल्या कोण जाणे. त्या वेळी रेकॉर्डिंगची डेडलाइन ठरलेली असायची. बैद्यनाथन यांना तर जिंगल देणेच होते. आता प्रश्न पडला, की लक्ष्मी गाणार नसेल तर मग दुसरे कोण गाणार? माहीत नाही कुठून चर्चेला सुरुवात झाली. कौटुंबिक मैत्री असूनही त्यांना चित्रा यांच्या गायनाविषयी फारशी माहिती नव्हती. गायन करीत असतीलही, पण त्यांना हे माहिती नव्हतं, की त्या चांगल्या गातातही.

ते अचानक चित्रा यांना म्हणाले, "चला तुम्ही गा. प्रयत्न करा."

चित्रा उडाल्याच. "मी गाऊ?"

ते म्हणाले, "हो... तुम्ही गायन कराच. प्रयत्न करा. तसंही ते जिंगल आहे."

अशा प्रकारे चित्रा यांनी जिंगल गायनात पाऊल ठेवलं. जय सौंदर्य साबणाच्या जाहिरातीसाठी ते जिंगल होतं. पुढे ते लोकप्रिय झालंच, शिवाय यामुळे चित्रा यांना अनेक ठिकाणांहून बोलावणं येऊ लागलं. यापूर्वी चित्रा यांनी कधीही बाहेर गायन केलेले नव्हते. वैद्यनाथन यांनी चित्रा यांची जिंगलसाठी कायमस्वरूपी नियुक्ती केली. त्यांना आता लक्ष्मी शंकर नको होत्या. चित्रा यांची यानंतर ओळख झाली मोहिंदरजित सिंग यांच्याशी. ते देबू दत्ता यांच्या घरी अनेकदा रेकॉर्डिंगसाठी यायचे. त्यांनी चित्रा यांची रेकॉर्डिंग ऐकली तेव्हा ते म्हणाले, "ही तर एकदम नूर जहाँची आवाज आहे!" त्यांनी दोन गाणी चित्रा यांना दिली. त्यातील एक गाणे

जगजितसिंग यांच्यासोबत होते. अर्थात, मोहिंदर यांनीच जगजितसिंग यांची चित्रा यांच्याशी ओळख करून दिली होती.

मोहिंदर यांनी जगजितसिंग यांची चित्रा यांच्याशी करून दिली ओळख

## चित्रा यांना आवडला नाही जगजितसिंग यांचा आवाज

मोहिंदर यांना गाणे यासाठी रेकॉर्डिंग करून हवे होते, की ते प्रोड्युसरला ऐकवता येईल. त्या वेळी त्यांनी अनेक नवोदित गायकांना बोलावले होते. मानस मुखर्जी, यशपालसिंग ('गीत गाता चल' फेम), सुलक्षणा पंडित अशा सर्वांना त्यांनी एकत्र केले होते. या सर्वांना रिहर्सलसाठी बोलावून घेतले. ही मैफल चित्रा यांच्या घरीच बसली होती. सर्व आर्टिस्ट आले. वेळ झाली. तेवढ्यात दारावर बेल वाजली. चित्रा यांनी दरवाजा उघडला. पाहतात तर काय, समोर एक माणूस भिंतीवर एक हात ठेवून झोपेच्या धुंदीत उभा होता. चित्रा यांना समोर पाहताच जागा झाला. घरात आला.

थोड्या वेळाने मोहिंदरजित आले नि म्हणाले, "ओय लल्लू, ऊठ. तू अपना गाना देख ले."

हा लल्लू उठला. तोंड- हात न धुताच बाजा (हार्मोनिअम) ओढून बसला. चित्रा यांच्यासह जमलेल्या सर्वच कलाकारांना त्या वेळी जगजित नावाचं गारूड अजिबातच माहिती नव्हतं. मोहिंदरजित सिंग यांनी त्याची ओळख करून दिली. "हा पंजाबमधून आलेला आहे. जगजितसिंग नाव आहे त्याचं."

एक तर जगजित झोपेतून उठले होते. त्यात त्यांचा आवाज डबल. चित्रा यांनी तर त्याला कधीच ऐकलेलं नव्हतं.

मोहिंदर चित्रा यांना म्हणाले, "तुला याच्यासोबत डुएट गायचंय."

चित्रा चपापल्या. त्या म्हणाल्या, "प्लीज, माफ करा. हा कसा डबल भारी आवाजात गातोय आणि माझा किती पातळ आवाज! मी त्याच्या स्ट्रेंथने नाही गाऊ शकणार. हे डुएट गाणं माझ्याकडून नाही होणार."

चित्रा जगजित यांची आणखी एक सवय सांगतात- ते म्हणजे एकदा त्याच्या हातात बाजा गेला तर तो दुसऱ्याच्या नशिबातच येतच नव्हता. तोच गात राहणार. दुसऱ्याला काही संधीच नाही.

1967 मध्ये जगजित यांचा पहिला इपी निघाला

**जगजितसिंग यांनी असे जिंकले चित्रा यांचे मन**

एकदा रिहर्सल दुसऱ्या ठिकाणी ठेवली होती. तिथे हीच सर्व आर्टिस्ट मंडळी होती. जगजितसिंगही तेथे होते. रिहर्सल संपली आणि सर्व घरी जाण्यास निघाले. त्या वेळी चित्रा जगजित यांना म्हणाल्या, "तू कुठे राहतो?"

तो म्हणाला, "मी आग्रीपाडा, शेर-ए-पंजाब."

चित्रा यांच्या रस्त्यावरच त्यांचा एरिया होता. त्यामुळे त्यांनी जगजितसिंग यांना त्यांच्या कारमध्ये लिफ्ट दिली. त्या म्हणाल्या, "मी तुम्हाला सोडते, पण ड्रायव्हर आधी मला घरी सोडेल. नंतर ड्रायव्हर तुम्हाला तुमच्या खोलीवर सोडेल."

चित्रा त्यांच्या घराजवळ उतरल्या. घराकडे निघणार त्याच वेळी त्यांना वाटलं, की अरे आपण याला चहापाणी विचारलं पाहिजे.

"चला चहा घेऊया आपण घरी." -चित्रा

या आग्रहावर जगजित लगेच आले. घरात बाजा होताच आणि बाजा पाहिला की जगजित सोडत नसायचे. चित्रा किचनमध्ये चहा बनवायला गेल्या. चहा बनवून बाहेर आल्या, तर जगजित तल्लीन होऊन गात होते. चित्रा यांनी त्यांची तंद्री भंग न करता शांतपणे त्यांच्यासमोर बसल्या. चित्रा यांना त्यांच्या आवाजाची जादू तेव्हा कळली. त्यांनी मनात विचार केला, की याचं गाणं आपल्याला थोडंसंही आवडलेलं नव्हतं, पण आता जो हा गात आहे, त्यात वेगळीच जादू आहे. कारण या वेळी ते कोणासाठीही गात नव्हते, तर उत्स्फूर्तपणे गात होते. त्या गाण्याचे शब्द होते...

धुंआ उठा था दीवाने के जलते घर से सारी रात,
लेकिन वो ख़ामोश रहे दुनिया के ड़र से सारी रात
(गीतरचना : शमीम शहाबादी)

हेच गाणं पुढे टर्निंग पॉइंट ठरलं. त्या वेळी चित्रा यांना कम्पोझिशन काय चीज असते ते समजलं. यापूर्वी त्या कधीही कम्पोझिशन समजून घेण्याच्या फंदात पडत नव्हत्या. फक्त गाणं गायचं, एवढंच त्यांना ठाऊक होतं. मात्र, जेव्हा हे गाणं ऐकलं, तेव्हा त्यांचे डोळे खाडकन् उघडले.

चित्रा यांनी आश्चर्याने विचारलं, "हे गाणं तुम्ही बसवलं?"

ते म्हणाले, "हो."

चित्रा चकित झाल्या. चित्रा यांना आणखी धक्का तर पुढे बसला. कारण कॉलेज संपवून जेव्हा जगजित मुंबईत पाऊल ठेवलं त्याच्याही दोन-तीन वर्षांपूर्वी त्यांनी ही चाल दिली होती. त्या वेळी जगजित यांचं वय असेल 21-22 वर्षांचं. तेव्हा हे गाणं त्यांनी बसवलं होतं.

त्यानंतर चित्रा यांना जगजितसिंग यांचेही गाणे आवडू लागले.. इथूनच पुढे एकमेकांशी संवादाचा सिलसिला सुरू झाला. दोघांनी जिंगल गायन सुरू केले. चित्रा यांना एका जिंगलसाठी


200 रुपये मिळत होते, तर जगजितसिंग यांना 50 किंवा 100 रुपये. कमाल ही होती, की बंगाल आणि पंजाबची ही जोडी सुमारे 20 भाषांमध्ये जिंगल गायन करीत होती!

कौन है हर सुबह सभी को सवारे

किस की ये आँखे ये प्यार के तारे
ये नर्मी ये गर्मी ये स्वाद ये चेहरे
ये रौनक जगायें...

आणि लगेच जाहिरातीची लाइन ऐकवली जाते...असली वनस्पती आज भी ममता की कसौटी पर खरा..

ही जाहिरात 60 च्या दशकातील असेल, जी रेडिओवर जगजितसिंग यांच्या आवाजात जिंगलच्या स्वरूपात ऐकायला मिळायची



५

# गझलांवर बंदी!

चित्रा यांच्या वैवाहिक आयुष्यात एक वादळ आलं. त्यांचे पती देबू दत्ता यांनी दुसऱ्या लग्नाचा निर्णय घेतला. हा चित्रा यांना मोठा धक्का होता. चित्रा यांना हे सहन होण्यापलीकडचं होतं. त्यामुळे एके दिवशी चित्रा यांनी निमूटपणे घटस्फोटावर सह्या केल्या आणि मुलगी मोनिकासोबत पतीचे घर सोडले. सुखवस्तूत रमलेल्या चित्रा आता एका खोलीच्या लहानशा फ्लॅटमध्ये राहू लागल्या. आयुष्य आता वेगळ्या वळणावर येऊन ठेपलं होतं. तो 1968 चा एप्रिल महिना होता. अर्थात, असा प्रसंग कधी वाट्याला येईल, असं त्यांना स्वप्नातही वाटलं नव्हतं. मात्र, हे कटू सत्य चित्रा यांनी स्वीकारलं. त्यानंतर चित्रा जगजितसिंग यांना सप्टेंबर 1968 मध्ये भेटल्या, जेव्हा ते रेकॉर्डिंगला आले होते. मात्र, जगजितसिंग यांच्या मनात एक गोष्ट कायमची घर करून राहिली, ती म्हणजे चित्रा यांना आपला आवाज अजिबात आवडत नाही ते काहीअंशी खरंही होतं! त्या वेळी चित्रा यांना तलत मेहमूद यांचा मखमली आवाज कमालीचा आवडायचा. त्यात जगजितसिंग यांचा आवाज त्यांच्या आवाजाशी अजिबात मेळ खात नव्हता. त्यांच्या मनात एकच सुरू होतं, की चित्रा यांना कसं इम्प्रेस करावं म्हणजे त्या आपल्या आवाजाला दाद देतील. त्यामुळे त्यांनी एक मार्ग निवडला, तो म्हणजे तलत मेहमूद यांच्यासारखं गाण्याचा रियाज करणे. त्यामुळे ते तलत मेहमूद यांचे गाणे दिवसरात्र गुणगुणत राहायचे...

सीने में सुलगते हैं अरमां
आँखों में उदासी छाई है
ये आज तेरी दुनिया से हमें
तक़दीर कहाँ ले आई है
सीने में सुलगते हैं अरमां

जगजित आणि त्याच्या मित्रांनी मिळून रेन्बो म्युझिक या नावाने एक ऑर्केस्ट्रा ग्रुप बनवला होता. य़ा ग्रुपमध्ये चित्राही होत्या. ईदमध्ये त्यांना आफ्रिकेला जाण्याचा प्रस्ताव आला. मग जगजित आणि चित्रासह रेन्बो म्युझिक ग्रुप आफ्रिकेला रवाना झाला. त्या वेळी जगजितसिंग चित्रपटगीतेच अधिक गात होते. आफ्रिकेतून परतले तर नव्या अडचणीत सापडले. त्या वेळी रंगभेदामुळे आफ्रिका वेगळा पडला होता. भारतानेही त्या देशाशी कोणतेही संपर्क न ठेवण्याचे धोरण अवलंबले होते. असे असतानाही जगजितसिंग यांचा ग्रुप तेथे मैफली घेतोच कसा, असा बाका प्रसंग उभा ठाकला. मात्र, ते जगजितसिंग यांना कुठे माहीत होतं! जगजितसिंग आणि त्यांचा ग्रुप मायदेशी परतला तेव्हा सर्वांचे पासपोर्ट जप्त करण्यात आले. एवढेच नाही, तर आकाशवाणीवर जगजितसिंग यांच्या गझलांवर बंदी घालण्यात आली.

या घटनेच्या बऱ्याच कालावधीनंतर हा तिढा सुटला. या आफ्रिका दौऱ्यात जगजित आणि चित्रा यांनी एकमेकांना जाणून घेतलं होतं. नव्या नात्याचे बीज रोवले गेले होते. अखेर एक दिवस असा आला, की पंजाबने बंगालसमोर एक प्रस्ताव (प्रपोज) ठेवला.

## जगजितसिंग यांनी घातली चित्रा यांना मागणी

अर्थात चित्रा यांना मागणी घालणंही गमतीदार होतं. त्या वेळी चित्रा किचनमध्ये स्वयंपाक करीत होत्या. त्याच वेळी दरवाजावर टक टक आवाज आला. दरवाजा उघडला तर जगजितसिंग समोर उभे. त्यांची अवस्था खूपच विचित्र होती. चेहरा पडलेला. अतिशय जर्जर अवस्थेत ते होते. त्यांना धड बोलताही येत नव्हतं. घरात आले नि थेट किचनमध्येच जाऊन बसले. चित्रा यांच्या लक्षात आलं, की जगजित तापाने फणफणत आहेत.

चित्रा त्यांना म्हणाल्या, "तुम्ही जरा वेळ बसा. मी तुम्हाला गरम पाणी करून देते. तुम्ही त्याची वाफ घ्या."

चित्रा यांनी टॉवेल दिला. तो टॉवेल डोक्यावर टाकून ते वाफ घेत होते. चित्रा पाठमोऱ्या उभ्या होत्या. काही तरी भाजीपाला कापत होत्या. त्याच वेळी त्यांना जगजितसिंग म्हणाले, "मला तुझ्याशी लग्न करायचंय."

चित्रा चकित झाल्या. म्हणाल्या, "काय? हे काय नवीन..? माझं लग्न झालेलं आहे."

जगजितसिंग म्हणाले, "मी तुझ्या होकाराची वाट पाहीन."

चित्रा काहीशा हैराण झाल्या. कारण जेव्हा जगजितसिंग यांनी प्रपोज केलं, तेव्हा चित्रा यांची केवळ मैत्रीच होती. मग लग्नाचा विषय कसा काय आला? कोणतेही कनेक्शन नव्हतं. चित्रा तशा फ्रेंडली होत्या. त्यांचे पतीही जगजितसिंग यांना म्हणायचे, तुला जेव्हा वाटेल तेव्हा तू ये. जेवण कर, पाहिजे तेव्हा राहा. हे सगळं होतं. जगजितसिंगही येत होते. इतरही अनेक जणांचा राबता होता. ते कॅरम खेळायचे, पत्ते खेळायचे. त्यापैकीच एक जगजितसिंग होते. तो एक फॅमिली फ्रेंड झालेला होता. बस एवढाच जगजितसिंग यांच्याशी चित्रा यांचा परिचय होता. आता अचानक दुसऱ्या लग्नाचा प्रस्ताव आल्याने त्या काहीशा द्विधा मनःस्थितीत सापडल्या. कारण नुकताच घटस्फोट झाला होता आणि मुलगीही मोठी होत होती. दुसऱ्या लग्नामुळे तिच्यावर काय परिणाम होईल, याची तिला जास्त चिंता होती. चित्रा यांची स्वतःशीच एक लढाई सुरू होती. त्यामुळे त्यांनी जगजितसिंग यांना टाळलं. अर्थात, या नकारामुळे त्यांच्या मैत्रीत मात्र कटुता कधी आली नाही. हळूहळू या मैत्रीने एक जबाबदारीही पेलली होती. एका तरुण महिलेनं एकटं राहणं, त्या काळी भयंकर जोखमीचंही होतं मुळी. या एकटेपणात चित्रा यांना भक्कम आधार दिला असेल तर तो जगजितसिंग यांनी. घरातला बल्ब बदलण्यापासून मुलगी मोनिकाची काळजी घेण्यापर्यंत ते चित्रासोबत राहिले. मोनिकासाठी ते 'जगजितकाकू' होते. हे सगळं चित्रा यांना कळत नव्हतं

असं नाही; पण ते त्या शांतपणे पाहत होत्या. त्यांना जाणवलं, की आपण आता आयुष्यात आणखी जोखीम घेऊ शकत नाही. काळ कापरासारखा उलटत होता.

## ना बँडबाजा, 30 रुपयांत केलं लग्न!

दोन वर्षांनी जगजितसिंग यांनी पुन्हा विवाहाचा प्रस्ताव ठेवला. या वेळी चित्रा त्यांना नकार देऊ शकल्या नाहीत. विवाहाला अखेर ग्रीन सिग्नल मिळाला. लग्नाची तयारी सुरू झाली. मित्रमंडळींना माहिती देण्यात आली. वडिलांच्या मनात जगजित यांच्याविषयी अजूनही नाराजी होती. त्यामुळे लग्नात त्यांची कोणतीही भूमिका नसेल, यात शंका नव्हती. दोघांनी निश्चित केलं, की मंदिरात साध्या पद्धतीने लग्न करायचं. कारण धूमधडाक्यात लग्न करण्याचं त्यांचं अजिबात बजट नव्हतं. अखेर 1970 मध्ये भारतातील या दोन ताऱ्यांनी अवघ्या 30 रुपयांत लग्न उरकलं!

प्रसिद्ध गायक भूपेंद्र याच मित्रमंडळींमध्ये होते. त्यांनी दोन हार आणले. जगजित यांचा तबलावादक हरीश यांनी अर्धा किलो मिठाईचा बॉक्स आणला. पंडितजींनी फेरे घालण्यास सांगितले आणि पाच मिनिटांत लग्न उत्साहात संपन्न. ना बँडबाजा, ना बारात, ना धूमधाम, ना रिसेप्शन. दोन वेगवेगळया मार्गांवरचे प्रवासी आता एकाच नावेत बसले होते. त्या वेळी कोणीही कल्पना केली नसेल, की ही जोडी भारतातील कोट्यवधी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवेल.

आता जिंगल स्टार चित्रा यांना जगजितसिंग यांच्या रूपाने पतीच नाही, तर गुरूही मिळाला होता. चित्रा यांना हिंदी आणि बंगाली बोलता येत होती, समजत होती आणि गाताही येत होतं. मात्र, गझलविश्वात उर्दूची समज अत्यंत आवश्यक होती. जगजितसिंग यांनी त्यांचं उर्दूशीही नातं जोडलं. चित्रा यांचं वैशिष्ट्य होतं, की एकदा लक्षपूर्वक ऐकलेलं त्या तंतोतंत कॉपी करीत होत्या. लग्नानंतर काही दिवस भटकण्यात गेले. नंतर दोघेही रोजीरोटीचा जुगाड करण्यात व्यस्त झाले. त्या काळात ब्रिजनारायण नावाचे व्यक्ती होते. संगीत रसिक आणि जाणकार होते.

तेथील रंगभवनात ते दरवर्षी 'एक श्याम गझल के नाम' करायचे. याच गझल कार्यक्रमातून या जोडीचा शुभारंभ झाला. दोघांनी दोनच गझला सादर करीत संपूर्ण मैफल लुटली.

## जगजित-चित्रा जोडीचे खुललं भाग्य...

1971 हे वर्ष जगजितसिंग यांच्यासाठी दोन गोड बातम्या घेऊन आलं. जानेवारी 1971 मध्ये चित्रा यांचा पहिला अल्बम मार्केटमध्ये आला आणि ऑगस्टमध्ये नवा पाहुणा आला. विवेक त्याचं नाव. पहिला अल्बम उभयतांच्या आयुष्यातला यादगार ठरला. पुढे झालं काय, की गझल कार्यक्रम संपल्याबरोबर एचएमव्हीचे अधिकारी या जोडीला भेटले. ते अधिकारी होते जी. एन. जोशी. संगीताचे उत्तम जाणकार होते. त्यांनी दोघांचेही कौतुक केले आणि नव्या रेकॉर्डिंगचे आमंत्रणही दिले. ते म्हणाले, मी मार्चमध्ये रिटायर्ड होतोय. त्याच्या आधी या मुलाचं (जगजितसिंग) रेकॉर्डिंग करण्याची माझी इच्छा आहे. त्या वेळी दोघांनाही खूप आनंद झाला. कारण अशी भली माणसं आजकाल कुठे मिळतात?

जगजित आणि चित्रा त्यांना स्टुडिओत भेटायला गेले. तेव्हा असं ठरलं, की खय्याम यांच्यावर संगीताची जबाबदारी सोपवली जावी. खय्याम यांनी ती स्वीकारलीही, पण काळ उलटत गेला. खय्याम काही आले नाहीत. स्टार लोकांचं असंच लहरी काम असतं. त्यामुळे रेकॉर्डिंग होऊ शकलं नाही. शेवटी जगजितसिंगच म्हणाले, "मी हे करू शकतो." जोशी खूश झाले. ते म्हणाले, "ही तर खूप चांगली गोष्ट आहे."

जगजितसिंग यांनी चार गाणी कंपोज केली. त्यापैकी एक गाणं अतिशय गाजलं. ते म्हणजे...

वो जो हम में तुम में क़रार था
तुम्हें याद हो कि न याद हो

पुढे जगजितसिंग यांच्या मित्रमंडळींमध्ये आणखी वादकांची भर पडली. ते रोज तासन् तास रियाज करीत होते. चित्रा यांच्यासाठी तो एक अविस्मरणीय काळ होता. त्या जगजितसिंग यांच्याकडून संगीताचे बारकावे शिकत होत्या.

सीर्फ शबनम ही शान-ए-गुलिस्ताँ नहीं
शोला-ओ-गुल का भी दौर चलता रहे
अश्क भी चश्म-ए-पुरनम से बहते रहे
और दिल से धुआँ भी निकलता रहे

चित्रा यांच्या आवाजातली मिठास काही औरच होती! एकट्या गात राहिल्या, की त्यांच्या आवाजात सहजता असायची; पण जगजितसिंग यांच्यासोबत गायला बसल्या, की ते त्यांच्यासाठी एक आव्हान असायचं. जगजितसिंग यांना ऐकणाऱ्यांच्या मूडची विलक्षण समज होती. म्हणजे त्यांनी एक प्रकारे रसिकांची नाडी ओळखली होती. त्यांना हे कळायचं, की चित्रा यांच्या आवाजातला कोणता रंग दाद मिळवून जाईल. ही जोडी कमालीची हिट होत गेली. दोन वर्षांनी त्यांचा आणखी एक अल्बम- 'सुपर सेव्हन' आला. या अल्बममधील गझल लोकं आजही गुणगुणतात...

जब भी आती है तेरी याद कभी शाम के बअ'द
और बढ़ जाती है अफ़्सुर्दा-दिली शाम के बअ'द

ही जगजितसिंग यांची 'सुपर सेव्हन'मधील आवडती गझल. दोघांचेही सूर छान जळले होते. घरचीही आर्थिक घडी सुधारत होती. जगजितसिंग यांनी पैशांची बचत करीत घरी मनिऑर्डर करणे सुरू केले होते. वडिलांची नाराजीही हळूहळू दूर होत गेली. मुलाचा आवाज रेडिओवर ऐकताना त्यांना कमालीचे कौतुक वाटायचे. डोळयांत आनंदाश्रू तरळायचे. जगजित यांच्या उदरनिर्वाहाचे माध्यम म्हणजे पार्टी, लाइव्ह शो आणि संगीत मैफिली. दुसरीकडे चित्रा यांनीही जिंगल गायन सोडलेले नव्हते. त्यांचे विदेश दौरेही वाढले होते. गंगानगरचा खोडकर तरुण व्यावसायिक गायक होत होता. मायानगरी तर त्यांच्यासाठी कार्पेट अंथरुणच बसली होती.

एके दिवशी एचएमव्हीकडून रेकॉर्डिंगचा नवा प्रस्ताव आला. त्या वेळी रेकॉर्डिंगमध्ये एचएमव्हीशिवाय दुसरी कंपनीच नव्हती. ते म्हणाले, की तुम्ही एलपी रेकॉर्डिंग करा. जगजितसिंग यांना इपीचा तसाही दहा वर्षांचा अनुभव होताच. मात्र, तरीही त्यांना त्या योग्यतेचे समजले जात नव्हते, की ते एलपी रेकॉर्डही करू शकतील. दहा वर्षांनंतर जगजित- चित्रा यांना ही संधी मिळाली. त्यात या दोघांचा पहिला धमाकेदार अल्बम आला- 'दि अनफॉरगेटेबल्स'. भारतीय आणि पश्चिमी यंत्रांचा अनोखा संगम या अल्बममध्ये होता. या अल्बमने या जोडीला एका रात्रीत स्टार बनवले. भारतीयांनी अनुभवलं, की कशा प्रकारे श्रीमंतांच्या मैफिलीतून सामान्य माणसाच्या घरात गझल पोहोचली होती. हा 1976 चा काळ होता.

या अल्बममध्ये जगजित यांनी एक हिट नज्म गायली. ती म्हणजे...

बात निकलेगी तो फिर दूर तलक जायेगी
लोग बेवजह उदासी का सबब पूछेंगे



४

# ८० हजारांची रॉयल्टी!

*बात निकलेगी तो फिर दूर तलक जायेगी...*

जावेद अख्तर यांनाही ही नज्म खूप आवडते. त्यांनी पहिल्यांदा ही नज्म ऐकली ती अमिताभ बच्चन यांच्या घरी. त्या वेळी जावेद अख्तर यांचं नेहमीच त्यांच्याकडे येणं-जाणं असायचं. तेही कधी अख्तर यांच्याकडे यायचे. त्या वेळी रविवारी असेच एकदा अमिताभ यांच्या घरी जावेद अख्तर गेले. त्या वेळी अमिताभ त्यांना म्हणाले, "मी तुम्हाला एक अल्बम ऐकवतो." त्यांनी तो प्ले केला आणि ही सुरेल नज्म कानी पडली. जावेद अख्तर यांनी पहिल्यांदाच हा आवाज ऐकला. तोपर्यंत जगजितसिंग ही काय चीज आहे हे त्यांना अजिबात माहीत नव्हतं.

जावेद अख्तर यांनी कुतूहलाने विचारलं, "कोण आहेत हे?"

अमिताभ बच्चन म्हणाले, "हे जगजितसिंग.."

खरोखर जगजितसिंग यांच्या आवाजातली बात निकली आणि दूर तलक गेली...

त्या वेळी एलपी रेकॉर्ड होणे नव्या कलाकारासाठी खूप मोठी गोष्ट होती. 'अनफॉरगेटेबल्स' हा अल्बम अविस्मरणीयच होता. तो विस्मरणात कधीच गेला नाही. त्या काळात ही मोठी क्रांती होती. संगीताचा चेहरामोहराच बदलला. अर्थात, या अल्बमची लोकप्रियता पाहायला जगजित आणि चित्रा भारतातच नव्हते. ते एका शेख यांच्या आमंत्रणावरून कुवेतला गेलेले होते. कुवेतमधील शानदार मैफली गाजवल्यानंतर दुबई, नंतर फ्रँकफर्ट, लंडनला रवाना झाले. सहा महिन्यांनंतर जेव्हा जगजित आणि चित्रा मायदेशी परतले

तेव्हा तर ते थक्कच झाले. 'अनफॉरगेटेबल्स'ने सगळे विक्रम मोडीत काढले. जगजित-चित्रा मायदेशी येताच एचएमव्हीने 80 हजारांचा रॉयल्टीचा धनादेश त्यांच्या हाती सोपवला. 1976 चा तो काळ. त्या वेळी 80 हजार रुपये म्हणजे छोटी रक्कम नव्हती. जगजित-चित्रा यांना जणू काही खजानाच मिळाला होता. भारतातील गझलविश्वातली ती एक खामोश क्रांती होती.

या 'अनफॉरगेटेबल्स' अल्बमचे कव्हर चित्र तयार केले होते चित्रा यांचे पहिले पती देबू दत्ता यांनी. या रेकॉर्डचा आणखी एक फायदा झाला. जगजित यांच्या वडिलांची नाराजी कायमची दूर झाली. आता वडिलांना जगजितसिंग यांचा अभिमान वाटू लागला. ते स्वतःही जगजितच्या गझला गुणगुणायचे. एका मुलाला आणखी काय हवं होतं! या वेळी जगजित यांनी निश्चित केलं, की आता मुलगा विवेकची आजी-आजोबांशीही भेट व्हायला हवी. जगजित चित्रासोबत लुधियानाला गेले, जेथे त्यांचे आईवडील राहत होते. घरी जगजित यांचे भरपूर लाडकौतुक झाले. त्यानंतर हा परिवार कोलकात्याला गेला.

लग्नानंतर चित्राच्या आईवडिलांशी जगजित यांची एकदाही भेट झालेली नव्हती. विशेष म्हणजे, त्यांना चित्राचा घटस्फोट आणि दुसऱ्या लग्नाचंही माहीत नव्हतं. त्यांना एवढेच माहीत होतं, की चित्रा देबू दत्ता यांच्यासोबत खूश आहे. मात्र, जेव्हा कळलं की चित्राच्या आयुष्यात बऱ्याच घडामोडी घडून गेल्या आहेत, तेव्हा ते स्तब्धच झाले. मात्र, जगजितला भेटल्यानंतर त्यांना कल्पना आली, की मुलीने घेतलेला निर्णय चुकीचा नाही. पुढे त्यांनी नेहमीच जगजित यांना मुलासारखं मानलं.

किशोरावस्थेपासूनच जगजित यांचा सुफियाना आणि आध्यात्मिकतेकडे अधिक कल होता. शिमल्यात पंजाबचे लोकप्रिय कवी शिवकुमार बटालवी यांना ते भेटले. या भेटीतच जगजित यांना त्यांच्या कवितांनी अक्षरशः वेड लावलं. त्याच वेळी त्यांच्या मनात एक सुप्त अपेक्षा होती, की कधी तरी आपल्याला बटालवी यांच्या कवितांच्या गायनाची संधी मिळो. आयुष्यात अशा संधी अवश्य येतात जेव्हा तुम्ही शिखराकडे जात असतात, तेव्हा समाज तुमच्या इच्छेपुढे

नतमस्तक होतो; पण जोपर्यंत तुम्ही अनोळखी असतात तेव्हा किती तरी इच्छा-आकांक्षा दम तोडतात. 'अनफॉरगेटेबल्स'ने लोकप्रियतेचे विक्रम मोडल्यानंतर जगजित सिंग यांनी एचएमव्हीसमोर बटालवी यांच्या कवितांच्या गायनाचा रेकॉर्ड काढण्याचा प्रस्ताव ठेवला. जगजित सिंग यांच्या लोकप्रियतेमुळे एचएमव्हीचा त्यांच्यावर विश्वास वाढला होता. कंपनीने जगजित यांच्या प्रस्तावाला लगेच मंजुरीही दिली. जगजित-चित्रा यांच्या या अल्बमचे नाव होते- 'बिरहा दा सुलतान सदाबहार.' या अल्बमचे कव्हर डिझाइन केले होते प्रसिद्ध चित्रकार इमरोज यांनी. हा काळ होता 1978 चा.


जगजित आणि चित्रा यांचे आयुष्य छान चालले होते. दोघांचेही एकापेक्षा एक हिट अल्बम येत होते. लोक तर त्यांच्या अल्बमचे दिवाने झाले होते. जेवढे ते भारतात लोकप्रिय होते त्यापेक्षा अधिक लोकप्रियतेचे शिखर विदेशात गाठले होते. त्यांच्या लोकप्रिय अल्बममधून एका अल्बमची किंवा गझलेची निवड करणे प्रचंड अवघड आहे. सर्वच अल्बममध्ये त्यांनी नवनवीन प्रयोग केले होते. त्या वेळी 'काळा तवा' कालबाह्य ठरला आणि ऑडियो कॅसेटने क्रांती घडवली. प्रत्येक कॅसेटचे कव्हर काही पानांचे असायचे. त्यावर सगळयाच गझला छापलेल्या असायच्या. ही कल्पना जगजितसिंग यांनीच पहिल्यांदा लोकप्रिय केली. भारतातील घराघरांत गझल पोहोचविण्याची जगजितसिंग यांची ही कल्पना अद्‌भुतच म्हणायला हवी. जगजित- चित्रा यांनी काही गझला अशाही गायल्या, ज्या अल्बमच्या माध्यमातून संगीतप्रेमींपर्यंत पोहोचू शकल्या नाहीत. त्या अप्रतिम गझलांपैकी एक म्हणजे...




सर जिस पे न झुक जाए उसे दर नहीं कहते
हर दर पे जो झुक जाए उसे सर नहीं कहते

'बिरहा दा सुलतान'नंतरच्या दहा वर्षांत जगजित आणि चित्रा या दोघांचे 16 अल्बम आले. या सर्व अल्बमनी लोकप्रियतेचे विक्रम रचले. त्यांनी देश-विदेशांत जेवढ्या गझला गायल्या त्या आता कालौघात धूसर होत आहेत. मात्र, विदेशातील काही दर्दी जाणकारांनी त्यांच्या काही गझला आजही जपून ठेवल्या आहेत. भारतातही अनेकांना या गझलांविषयी माहिती नसेल. त्यांच्या अनेक गझला अशा आहेत ज्या विदेशातच गायल्या आहेत. भारतात त्यांनी कधी त्या सादर केलेल्या नाहीत. एका दर्दी रसिकाने त्यांना विचारलं होतं, की "तुम्ही विदेशात ज्या गझल पेश करतात, त्या भारतात कधी सादर केल्या नाहीत. उलट विदेशात सादर केलेल्या गझल तर किती तरी पटीने सुरेख होत्या. मात्र भारतात तुम्ही पंजाबी धाटणीच्याच गीतांना प्राधान्य दिलं. असं का?" त्यावर त्यांनी एका वाक्यात उत्तर दिलं, "ती एक्स्पोर्ट क्वालिटी होती!" जगजित सिंग यांनी प्रेक्षकांची नस ओळखलेली होती. त्यामुळे कुठे कोणत्या गझलांना दाद मिळेल आणि कोणत्या गझलांना नाही, याची त्यांना कमालीची जाण होती. कदाचित यामुळेच त्यांनी विदेशात गायलेल्या गझला भारतात कधीच सादर केल्या नाहीत. त्यांच्या अनेक रेकॉर्डची लोकप्रियता दूरपर्यंत पोहोचली होती. 1979 मध्ये 'कम अलाइव्ह इन अ लाइव्ह' ही रेकॉर्डही प्रचंड गाजली.

जगजितसिंग यांचे सहयोगी कलाकार साउंड इंजिनीअर दमन सूद यांनीही अल्बमविषयीच्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणतात, की 'कम अलाइव्ह..' ही रेकॉर्डिंग जेव्हा




ण लाइव्ह कॉन्सर्ट ऐकतोय. मुळात ती लाइव्ह रेकॉर्डिंग डिओमध्ये लोकांना बोलावून त्यांची उत्स्फूर्त दाद रेकॉर्ड रेकॉर्ड करून त्यात लोकांची उत्स्फूर्त दाद मिक्सिंग केली. यांची होती. म्हणजे काळाची पाऊले त्यांनी किती पूर्वी वी मिक्सिंग होते. मात्र, 80 च्या दशकात असा विचार पुढे होते याचे हे उदाहरण.

तलत अझिझ यांनी 1979 मध्ये ऑल इंडिया रेडिओशी अल्बमचा करार केला, तेव्हा त्यांनी जगजितसिंग यांचीच मदत घेतली. तलत यांनी जगजित यांना फोन करून विचारलं, की मी एक अल्बम काढतोय. तुम्ही त्यासाठी कम्पोझिशन्स कराल का? जगजितसिंग लगेच हो म्हणाले. 'जगजितसिंग प्रेझेंट्स तलत अझिझ' हा तो अल्बम. नंतर 'मै और मेरी तनहाई' असे अनेक हिट अल्बम जगजितसिंग यांनी दिले. उर्दू साहित्यातील लोकप्रिय नाव म्हणजे डॉ. बशीर बद्र. त्यांच्याही अनेक गझला जगजितसिंग यांनी गायल्या.



७

# जीवघेणा आघात

जगजितसिंग यांचे परदेशातील लाइव्ह कॉन्सर्ट प्रचंड लोकप्रिय असायचे. लोकांना तिकीट मिळत नव्हते इतकी प्रचंड गर्दी असायची. त्याची प्रचीती लंडनमधील रॉयल अल्बर्ट हॉलमध्ये आली. 1981 मध्ये हा कार्यक्रम होता. या अल्बर्ट हॉलची क्षमता सहा हजार प्रेक्षक क्षमतेची होती. बर्मिंगहॅमसह अनेक ठिकाणाहून प्रेक्षक आले होते. विश्वास बसणार नाही, पण अनेकांना तिकीट मिळाले नाही म्हणून माघारी फिरावे लागले. गिटारवर क्लेरन्स पीटरसन यांनी त्या वेळी साथसंगत केली होती. या आठवणींना त्यांनी एके ठिकाणी उजाळा दिला होता. हा कार्यक्रम सुपरहिट झाल्याने पुढे 1982 मध्ये याच कार्यक्रमाचा अल्बम काढण्यात आला. तो म्हणजे 'लाइव्ह अॅट दि रॉयल अल्बर्ट हॉल.' वाढत्या लोकप्रियतेमुळे जगजितसिंग हुरळून कधीच गेले नाही. गझल गायकीवर आणखी लक्ष देत अनेक गझलांना संगीत देण्यात ते व्यस्त झाले. 1982 मध्येच त्यांचा आणखी एक अल्बम निघाला- 'दि लेटेस्ट'.

लबों से लब जो मिल गए
लबों से लब ही सिल गए
सवाल ग़ुम जवाब ग़ुम
बड़ी हसींन रात थी।

त्यानंतर जगजितसिंग यांचे एकापाठोपाठ अल्बम आले आणि सुपरहिट झाले. 1983 मध्ये 'कृष्णा', 1984 मध्ये 'एक्स्टॅसिज.' त्यांच्या बहुतांश अल्बमची नावे इंग्रजीत असायची. त्याचे कारण म्हणजे विदेशातली लोकप्रियता.

हम को दुश्मन की निगाहों से न देखा कीजे

प्यार ही प्यार हैं हम, हम पे भरोसा कीजे

चित्रासिंग यांच्या आवाजातील ही नज्म अप्रतिमच. जगजितसिंग यांनी कंपोज केलेल्या गझलांना मागणीही वाढली होती. डॉ. बशीर बद्र उर्दूतले लोकप्रिय कवी. त्यांच्या अनेक गझला जगजितसिंग यांनी गायल्या. सुरुवातीला प्रत्येक अल्बममध्ये एखादी गझल डॉ. बद्र यांची असायची. 1987 मध्ये जगजितसिंग यांचा 'पॅशन्स' हा नवा अल्बम आला.

अगर हम कहें और वो मुस्कुरा दें
हम उनके लिए ज़िंदगानी लुटा दें
हर इक मोड़ पर हम ग़मों को सज़ा दें
चलो ज़िन्दगी को मोहब्बत बना दें

'पॅशन्स'मधील जगजितसिंग आणि चित्रा यांच्या आवाजातील हे युगलगीत तर खूपच सुरेख. ऐकताना मन एकाग्र होतं. 1988 मध्ये 'लाइव्ह इन कन्सर्ट' या अल्बमनंतर त्याच वर्षी 'बियाँड टाइम' आला. 'बियाँड टाइम' भारतातला पहिला डिजिटल अल्बम होता. त्याचे रेकॉर्डिंग लंडनमधील जेकब्स स्टुडिओत झाले होते. या अल्बमने तर अनेकांवर मोहिनी घातली. त्यातील गझलांनी तर अक्षरशः वेड लावलं होतं.

अपनी आग को ज़िंदा रखना कितना मुश्किल है
पत्थर बीच आईना रखना कितना मुश्किल है

जगजितसिंग आणि चित्रासिंग यांचा हा सुवर्णकाळ होता. त्या वेळी गझलांचा सुपरस्टार म्हणून जगजितसिंग यांचा लौकिक होता.

'बियाँड टाइम'मध्ये आधुनिक वाद्यांचा प्रयोग केला होता. गिटार, ऑक्टोपॅड, पियानो आणि कीबोर्डचा प्रथमच उपयोग केला होता. 1989 मध्ये 'डिझायर' हा अल्बम आला.

दिन आ गए है शबाब के आँचल संभालिए
होने लगी है शहर में हलचल संभालिए

अशा अनेक गझला डिझायरने लोकप्रिय केल्या. जगजितसिंग आणि चित्रा यांचं आयुष्य छान सुरू होतं. जणू ही विश्वातली सर्वांत सुंदर जोडी आहे. सोबतीला विवेक आणि मोनिकाची गोड सोबतही होतीच. या कुटुंबाच्या आयुष्यातच एक सुरीलेपण होतं. एक प्रकारची लय होती. सूर जुळले, की सुख परमोच्च स्थानी जातं. सगळं काही छान सुरू असताना काय कोणास ठाऊक, या कुटुंबावर मोठा आघात झाला. सुरमयी आयष्याचे गाणे छान सुरू असताना सतारीची तार तुटावी तसाच काहीसा प्रसंग त्यांच्या आयुष्यावर गुदरला. 28 जुलै 1990 ही त्यांच्या आयुष्यात एक काळरात्र आली. ऐन तारुण्यात त्यांचा 18 वर्षांचा मुलगा विवेकचा अपघातात मृत्यू झाला. हा आघात जगजितसिंग आणि चित्रा यांच्या सहनशक्तीपलीकडचा होता. कारण विवेक अशा ठिकाणी गेला, जिथून तो परत कधीच येणार नव्हता. येत होत्या फक्त आठवणी. जगजितसिंग यांनी अनेक संकटे झेलली होती. मात्र, काळजाचा तुकडा असलेल्या विवेकच्या मृत्यूने ते कोलमडले. हसत्याखेळत्या घरात स्मशान शांतता पसरली होती.

एक आह भरी होगी हमने ना सुनी होगी
जाते जाते तुमने आवाज़ तो दी होगी
हर वक़्त यही है ग़म, उस वक़्त कहाँ थे हम
कहाँ तुम चले गए
चिठ्ठी न कोई संदेस जाने कौन से देश
जहाँ तुम चले गए

ही गझल मग हेलावून टाकते. पुत्रवियोगानंतर जगजितसिंग आणि चित्रा यांनी गायकीतून अंगच काढून घेतले. त्यांना आता मुलगी मोनिकाचाच आधार उरला होता. असं असलं तरी विवेकची जागा कोणीही भरून काढू शकलं नाही. घराची घडी विस्कटली होती. असं म्हणतात, की काळ उणीव भरून काढतो. पण ही पोकळी अशी निर्माण झाली होती, की ती भरून निघालीच नाही. चित्रा यांना इतका सद्मा बसला होता, की त्या निःशब्द झाल्या. तोंडातून शब्द फुटत नव्हते. गळ्यातून सूर उमटणे ही तर दूरची गोष्ट. 28 जुलै 1990 च्या काळरात्रीनंतर चित्रा

यांना कोणीही गाताना पाहिलं नाही. जगजितसिंग यांनीही दोन महिने गाणे सोडले होते. मात्र, स्वतःला सावरत ते पुन्हा गाऊ लागले. यापूर्वी त्यांच्या दर्दभऱ्या गझलगायकीत वेदना होती. आता जगजितसिंग स्वतःच वेदनेने व्याकुळ होऊन गाताना दिसत होते. काही वेळा ते इतके भावनिक व्हायचे, की कार्यक्रमात काही वेळा ते ब्रेक घ्यायचे. नंतर मोठ्या हिमतीने स्वतःला सावरत पुन्हा तानपुरा जवळ करायचे. हा कठीण काळ त्यांनी पचवला आणि 1990 मध्ये त्यांचा नवा अल्बम आला- 'समवन समव्हेअर.' अर्थात, या अल्बमचे आधीच रेकॉर्डिंग झाले होते. मात्र प्रदर्शित केलेला नव्हता. अचानक विवेकच्या मृत्यूनंतर तो लांबणीवर पडला होता.

जगजितसिंग यांच्या आवाजातला गोडवा आणखी वाढला. पुत्रवियोगाने ते काहीसे खचल्याची चिन्हे स्पष्टपणे जाणवत होती. यापूर्वी त्यांच्या आवाजात तारुण्य आणि कारुण्य पाहायला मिळायचे. आता फक्त कारुण्य उरले होते. तारुण्य अचानक प्रौढत्वाकडे गेले. त्यांचा कल आध्यात्मिकतेकडेही वाढला होता.

आज्ञा पई अकाल दी, तबे चलायो पंथ,
सब सिखन को हुक्म है गुरु मानयो ग्रंथ...

भक्तिरसात ते लीन झाले होते. स्वतःला सावरत पुन्हा त्यांनी गझल, भजन, नज्म, गीतांची गंगा चाहत्यांपर्यंत आणली.1990 नंतर पुन्हा अल्बम आले.

उसको रुखसत तो किया था मुझे मालूम न था
सारा घर ले गया घर छोड़ के जाने वाला...

1991 मध्ये 'होप' हा अल्बम आला. त्यानंतर 'कहकशाँ' हा अल्बम आला. हा दूरदर्शनवरील मालिकेवर आधारित होता. हा त्यांच्या अनेक अल्बमपैकी सर्वांत उत्तम अल्बम मानला जातो. अली सरदार जाफरी यांनी कहकशाँची जबाबदारी सांभाळली होती. यात हसरत मोहानी, मजाज लखनवी, फिराक गोरखपुरी, मखदूम, जिगर मोरादाबादी, जोश मिलिहाबादी

या उर्दूतील निवडक कवींची शायरी समाविष्ट होती. जोश मिलिहाबादींची एक गझल तर जगजितसिंगच्या आवाजात अजरामर झाली.

सब की झोली मेरी झोली,
सब की टोली मेरी टोली,
सब की होली मेरी होली,
सब की बोली मेरी बोली,
सब का जीवन मेरा जीवन।
बोल इक तारे झन झन झन झन

'कहकशाँ'मधील एक गझल चित्रा यांच्या आवाजातलीही होती. ही गझल विवेकच्या मृत्यूपूर्वी रेकॉर्ड केली गेली होती. याच काळात 1991 मध्ये 'व्हिजन' हा अल्बमही लोकप्रिय झाला. संथ वाहणाऱ्या नदीसारखे त्यांचे सूर चाहत्यांचे मन समृद्ध करीत गेले. 1992 मध्ये 'सजदा' अल्बम आला. हा अल्बम लता मंगेशकर यांच्यासोबत होता. गझलविश्वातला हा पहिलाच प्रयोग होता. त्यानंतर याच वर्षी आणखी एक धमाकेदार अल्बम आला- 'इन सर्च.' 1993 मध्ये 'इनसाइट'... जगजितसिंग यांनी दरवर्षी वेगवेगळे अल्बम चाहत्यांसाठी आणले. यात जुन्या रचना होत्या, काही धार्मिक होते, तर काही चित्रपटगीते. 1994 मध्ये 'फेस टु फेस', 1995 'क्राय फॉर क्राय', 1996 'युनिक', 'मिराज.' 1997 मध्ये 'लव्ह इज ब्लाइंड', 1998 'सिलसिले', 1999 'मरासिम', नंतर 'दिल कहीं होश कहीं', 'नई दिशा', 'अ जर्नी', 'सहर', 'आइना'...अशा अनेक अल्बममधून जगजितसिंग चाहत्यांचे समाधान करीत गेले.

मुझसे बिछड़ के खुश रहते हो
मेरी तरह तुम भी झूठे हो
इक टहनी पे चाँद टिका था
मैं ये समझा तुम बैठे हो

2001 मध्ये 'डिफरंट स्ट्रोक', 'सोझ', 'लाइफ स्टोरी', 2002 मध्ये 'फर्गेट मी नॉट', 'संवेदना'...'संवेदना' हा दिवंगत माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या कवितांवर आधारित अल्बम आहे. 2003 मध्ये 'क्लोज टू माय हार्ट', 'शिवा', 2004 मध्ये 'मुंतझिर' असे एकापाठोपाठ त्यांचे अल्बम आले नि लोकप्रियही झाले.

रात बैठी है बाहें पसारे
सिसकियां ले रहे है सितारे
कोई टुटा हुआ दिल पुकारे
हमदम तू कहाँ है...

2005 मध्ये 'बेस्ट ऑफ जगजित आणि चित्रा', 'तुम तो नहीं हो', 2009 मध्ये 'इन्तेहां' असे अनेक अल्बम आले. जगजितसिंग गझल आणि गझलकारांची निवड स्वतःच करायचे. गझल ते इतके परखून घ्यायचे, की जोपर्यंत त्यांचे समाधान होत नाही, तोपर्यंत ती गझल त्यांच्या अल्बममध्ये जागा मिळवू शकत नव्हती. 2012 मध्ये 'तेरा बयान गालिब', 'दि मास्टर अँड हिज मॅजिक' हे त्यांचे अखेरचे अल्बम ठरले. अर्थात, हे दोन्ही अल्बम त्यांनी जगाला अलविदा केल्यानंतर आले.



८

# हे स्वप्न अधुरेच

जगजितसिंग यांचं पडद्यावरील पहिलं पाऊल पडलं, ते 'बहुरूपी' या गुजराती चित्रपटाद्वारे. 1969 मध्ये हा चित्रपट पडद्यावर झळकला होता. त्यांनी या चित्रपटात काही गीतेही गायली. एक प्रकारे त्यांचा सफर सुरू झाला होता. मात्र, ज्या अपेक्षेने ते मायानगरीत आले होते, त्या अपेक्षा काही पूर्ण झाल्या नाहीत. मायानगरीत पाऊल ठेवल्यानंतर बॉलिवूडमध्ये टिकणे महत्त्वाचे असते. त्या वेळी बॉलिवूड हा शब्दही प्रचलित नव्हता. चित्रपटसृष्टीच म्हंटले जायचे. जगजितसिंग यांना 1970 मध्ये आणखी एका गुजराती चित्रपटात संधी मिळाली. 'धरती ना छोरों' हा तो चित्रपट. त्यात सुमन कल्याणपूर व जगजितसिंग यांनी एक युगलगीत गायले आहे. त्यानंतर जगजितसिंग यांनी मागे वळून पाहिलेच नाही. संघर्षकाळात ज्यांच्यासोबत ते दुःख शेअर करायचे त्या सुभाष घई यांनी पुढे उत्तम दिग्दर्शकच नव्हे, तर उत्तम निर्माता व पटकथालेखक म्हणूनही लौकिक मिळवला. दुसरीकडे जगजितसिंग यांच्या अल्बमनाही भारतीय संगीतप्रेमींनी डोक्यावर घेतले होते. सुभाष घईंच्या दोन चित्रपटांत त्यांनी गझल गायल्या आहेत. ते दोन चित्रपट म्हणजे 'खलनायक' आणि 'जॉगर्स पार्क'. 'खलनायक'मध्ये 'ओ माँ तुझे सलाम, तेरे बच्चे प्यारे, रावण हो या राम' आणि 'जॉगर्स पार्क'मध्ये 'बडी नाजूक है ये मंजील, मोहब्बत का सफर है...'

2001 मधील 'तुम बिन' या चित्रपटातली एक गझल खूपच लोकप्रिय झाली होती. अर्थातच साडेसात मिनिटांच्या या गझलेला जगजितसिंग यांच्या गायकीचा 'मिडास टच' होता.

जागते जागते एक उम्र कटी हो जैसे
जान बाकी है मगर सांस रुकी हो जैसे

2016 मध्ये 'तुम बिन'चा दुसरा पार्ट प्रदर्शित झाला. त्यातही जगजितसिंग यांचीच गझल होती. 'ओ नजर छुपती मुझे देख रही हो जैसे...' या गझलेने अनेकांच्या मनात घर केलेलं होतं. त्यामुळेच निर्माते भूषण कुमार यांनी दुसऱ्या भागातील 'तुम बिन'मध्ये या गझलेची जादू पुन्हा आणली. अनेक चित्रपटांमधील जगजितसिंग यांच्या गायकीने अनेकांना मोहित केले होते. त्यातली गीते आजही मनात रुंजी घालतात...

नींद के गाँव में आज यादों का बाज़ार है
खिलखिलाते हुए अपना दामन उठाते हुए
बच्चों के पाँव की धूल का कारवाँ
गाँव की हर गली अपने पैरों की ज़ंजीर है
गाँव का हर मकान अपने रस्ते की दीवार है
नींद के गाँव में आज यादों का बाज़ार है

अशी काही गीते ऐकली, की ही जादू खरोखर जाणवते. अर्थात, नाही म्हंटलं, तरी चित्रपटांतली गाणी गाण्याचा त्यांना एक प्रकारे उबगच आला होता. त्यांनी त्यामागचं कारणही स्पष्ट केलं होतं. ते म्हणाले होते, की चित्रपटांतल्या गाण्यासाठी अनेकांचं तुष्टीकरण करावं लागतं. आधी ते दिग्दर्शकाला समाधानी करावं लागतं, नंतर कथानकाला, नंतर ते ज्यांच्यावर रचलं आहे त्या नायक-नायिकांना समाधानी करावं लागतं. जिथे हे गाणे शूट होणार आहे त्या लोकेशनलाही

ते सूट झालं पाहिजे. या सगळ्या दिव्यातून मग ते गाणं फायनल होतं. त्यामुळे जगजितसिंग यांना मनासारखं काही करताच येत नव्हतं. नंतर त्यांनी चित्रपटांत गायन करणेच सोडून दिल्याचे सांगितले जाते. मात्र, जगजितसिंग यांनीच यावर खुलासा करताना सांगितले, की मी चित्रपटांत गायन करणे सोडले नाही, तर मलाच चित्रपटसृष्टीने सोडले. कारण ज्या प्रकारचं संगीत त्यांना हवं होतं, ते माझ्याकडून त्यांना मिळत नव्हतं. त्यांनी सुरुवातीला 'अर्थ', 'प्रेमगीत', 'साथ साथ' आदी काही चित्रपटांत गीतगायन केले होते. अर्थात, या सुरुवातीच्या काळात त्यांनी काही चुकीचे चित्रपटही निवडले. त्यांना कळलं, की अरे आपण चुकीच्या मार्गाने जात आहोत. असं धावणं व्यर्थ आहे, म्हणून त्यांनी तो मार्गच सोडून दिला. त्यांच्या मते, यात कसलं आलंय स्वातंत्र्य? त्यापेक्षा स्वतःच गीते निवडून स्वतःलाच समाधानी करणं केव्हाही चांगलं. नंतर ते स्वतःच्या मार्गाने गेले. त्याचे रिझल्ट तुम्ही पाहतच आहात.

देशभरातील कलाकार मायानगरीत येतात, त्याचं मूळ कारण बॉलिवूडमध्ये ब्रेक मिळावा, हेच आहे. जगजितसिंग यांनीही आधी हेच केलं होतं, पण लवकरच त्यांना त्यातून बाहेर पडावंसं वाटलं. मात्र, अनेकांनी या बॉलिवूडमध्ये पाय रोवण्यासाठी तोच मार्ग निवडला, जो जगजितसिंग यांनी केव्हाच नाकारला होता. जगजितसिंग बॉलिवूडमधून बाहेर पडले, पण बॉलिवूडने त्यातून काही बोध घेतला नाही. केवळ बाजाराचे निकष पूर्ण करताना बॉलिवूडने जगजितसिंग यांच्यासारखा जादूई आवाजाचा गायक गमावला होता. जेव्हा जगजितसिंग स्वतःच्या समाधानासाठी गायचे तेव्हा त्यांच्या गायकीचे अनेक रंग बाहेर पडायचे.

'यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत...' हा भगवद् गीतेतला श्लोक असो वा 'त्वमेव माता च पिता त्वमेव । त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव । त्वमेव विद्या द्रविणम् त्वमेव । त्वमेव सर्वम्

मम देव देव' हा संस्कृत श्लोक असो.. हे ऐकल्यानंतर वाटत नाही, की हा आवाज विरह वेदनेच्या गझलाही गात असेल! पण हीच तर त्यांच्या आवाजाची खासियत होती, ज्यात सगळे जीवनरस सामावलेले होते. त्यांनी गायलेल्या 'हरे कृष्णा हरे कृष्णा। कृष्णा कृष्णा हरे हरे' या भजनांमध्ये लोकांना तल्लीन व्हावेसे वाटते. अर्थात, ही भक्तिगीते त्यांची पूजा मुळी नव्हतीच, तर गायकी हीच त्यांची सर्वांत मोठी पूजा होती. त्यात सगळ्याच धर्मांना समान जागा होती. ते म्हणतातही, "धर्म ही एक जीवनशैली आहे. ते आपल्याला शिकवतात, की जगायचे कसे? बाकी मंदिरात जाणं, टिळा लावणं, घंटानाद करणं इत्यादी पूजाविधी आहेत. ते महत्त्वाचे अजिबात नाहीत. महत्त्वाचे हेच आहे, की तुम्ही ज्या धर्माचे पालन करताहात, त्यांनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही जीवन जगत आहात किंवा नाही. जर तसं जगत नसाल तर काही उपयोग नाही. मी तर सर्वच धर्म मानतो."

जगजितसिंग नव्या पिढीतल्या उदयोन्मुक कलावंतांना गझल गायकीचे धडेही द्यायचे. अनेक कार्यक्रमांत ते शास्त्रीय संगीत म्हणजे काय, याची माहितीही  द्यायचे. शास्त्रीय संगीताचे जाणकार असणे वेगळे आणि सामान्यांना त्याची माहिती सोप्या भाषेत देण्याची कला वेगळी. जगजितसिंग यांच्याकडे ती होती. म्हणूनच ते सामान्य माणसांनाही त्यांच्या भाषेत संगीतकलेची माहिती पोहोचवू शकले. त्यांचं जग'जित' हे नाव त्या अर्थानेही शब्दशः सार्थ ठरलं.

1995 मध्ये 'क्राय और क्राय' हा अल्बममध्ये त्यांनी गायकीचा उत्तम नमुना पेश केला. यात त्यांनी गरीब आणि शेतकऱ्याच्या वेदना आपल्या गायकीतून खूपच सुंदर पद्धतीने पेश केल्या आहेत...

अब मैं राशन की क़तारों में नज़र आता हूँ
अपने खेतों से बिछड़ने की सज़ा पाता हूँ

ही नज्म ऐकल्यानंतर जाणवतं, की खरंच जगजित यांची गझल केवळ प्रेमाच्या मैफली सजविणारी नाही, तर सामान्यांच्या हृदयाचा ठाव घेणारीही आहे.

मैं ना हिंदू ना मुसलमा मुझे जिने दो
दोस्ती है मेरा इमान मुझे जिने दो
कोई ऐहसाँ ना करो मुझ पे तो एहसाँ होगा
सीर्फ इतना करो एहसाँ मुझे जिने दो

हे गीत तर इतकं अप्रतिम आहे, की कितीही वेळा ऐकलं तरी समाधान होत नाही. जगजितसिंग यांच्या गळयाला सोशल टचही आहे याची प्रचीती येते. जीवनाचे सगळे रस असे ठासून भरलेले होते.

तेरा चेहरा कितना सुहाना लगता है
तेरे आगे चाँद पुराना लगता है

शांतपणे गझला ऐकणारं मन या गझलेवर मात्र प्रफुल्लित होतं. विदेशातील एका कॉन्सर्टमध्ये अनेक जण प्रत्येक नज्मला उत्स्फूर्त दाद देत असल्याचे अनेकांनी पाहिले आहे. ही त्यांच्या आवाजाची जादू. ही गझल पेश करताना ते पती-पत्नीवर आधारित अनेक विनोदही सांगायचे. त्यामुळे मैफलीत हास्याचे कारंजे उडायचे. एक विनोद इथे सांगावासा वाटतो...

एकदा पत्नी माहेरी जाते. पती घरी एकटा असतो. तो पत्नीचे छायाचित्र भिंतीवर टांगतो आणि त्यावर चाकू फेकून निशाणा साधण्याचा प्रयत्न करतो. पण एकही निशाणा लागत नाही. तेवढ्यात पत्नीचा फोन येतो- "डार्लिंग क्या कर रहे हो..?"

पती : तुम को मिस कर रहा हुं..

जगजितसिंग गझलगायन करतात म्हणजे ते गंभीर असतात असं नाही. भलेही त्यांचा चेहरा गंभीर वाटत असेल, पण ते तसे नाहीत हे या उदाहरणावरून जाणवतं. अनेक गीते त्यांनी अशी सादर केली आहेत, की त्या गाण्यावर सगळेच थिरकतात. अगदी जगजितसिंगही थिरकताना अनेकांनी पाहिले आहेत. असं असलं तरी एक गीत असंही आहे, की त्या गाण्यावर अनेकांच्या डोळ्यांतून अश्रू घळाघळा वाहतात. हे पंजाबी लोकगीत आहे, ज्यात एका पत्नीला विदेशात गेलेल्या पतीची आठवण येते. तिला मूल नसते, त्यामुळे तिला कमालीचा एकटेपणा जाणवत राहतो. त्यामुळे ती एक मातीचा पुतळा बनवते आणि त्याच्यात आपलं मन रमवते...

मिट्टी दा मैं बावा बनाणीआं
उत्ते चा दिन्नी आं खेसी
वतनां वाले माण करन
की मैं माण करां परदेसी
मेरा सोहणा माही, आजा वे

हे मन व्याकुळ करणारं लोकगीत आणि त्यात जगजितसिंग यांचा आवाज... जगजितसिंग यांनी वीसपेक्षा अधिक भाषा, तसेच बोली भाषेतील गीते गायली आहेत. 1995 मध्ये कुरुक्षेत्र विद्यापीठाने त्यांना डी.लिट. पदवीने सन्मानित करण्यात आले, तर 1998 मध्ये लता मंगेशकर पुरस्कार, 1999 मध्ये दयावती मोदी पुरस्काराने गौरविण्यात आले. 'बियाँड टाइम' ही जगजितसिंग यांची आत्मकथा आहे.

जिस्म की बात नहीं थी उन के दिल तक जाना था
लम्बी दूरी तय करने में वक़्त तो लगता है
गाँठ अगर लग जाए तो फिर रिश्ते हों या डोरी
लाख करें कोशिश खुलने में वक़्त तो लगता है

जगजितसिंग यांना सुरांचं इतकं ज्ञान होतं, की त्यांच्या साथीदारांच्या वाद्यातला थोडासाही सूर हलला तर ते लगेच ओळखायचे. गिटार, सतारवादनात त्यांना तसं काही जाणवलं, की ते लगेच त्या वादकाला म्हणायचे, जी नोट ठीक कर, एफ नोट ठीक कर. हे सगळं ते स्टेजवरच सांगायचे. पण मनाने खूपच निर्मळ. आपल्या साथीदारांची ते तेवढीच काळजीही घ्यायचे.

कुदरत ने इसको अपने हाथों से है संवारा
वीरों ने इसको अपने है खून से निखारा
सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा

जगजितसिंग यांच्या आवाजातील हे देशभक्तिगीत अनेकांनी ऐकले असेल. हे गीत ऐकणारी पिढी आता धूसर होत चालली आहे. केवळ दर्दी संगीतप्रेमींनाच ते आता ठाऊक असेल.

## जगजितसिंग अश्वप्रेमीही होते

गझलगायकीत रमणारे जगजितसिंग यांना घोड्यांवर विशेष प्रेम होतं, हे खूपच कमी लोकांना माहीत असेल. हा शौकही त्यांना मुंबईतच लागला. सुरुवातीला ते आग्रीपाडात राहायचे तेव्हा काही पंटर घोडे आणायचे. हळूहळू पंटिंग सुरू केली. म्हणजे घोडेस्वारी सुरू केली. जेव्हा त्यांच्याकडे पैसे आले तेव्हा त्यांनी घोडेही खरेदी केले. मग रेसिंगमध्येही भाग घ्यायला सुरुवात केली. यातूनच त्यांना घोड्यांची माहिती मिळाली. त्यांना अनेक घोड्यांची विशेष पारख होती. कोणता घोडा कोणत्या रेसमध्ये जिंकेल किंवा कोणत्या घोड्याला पळवायला हवं, याचीही समज त्यांना होती. त्यांच्याकडे 10-15 उमदे घोडे होते.

एक शेर आहे...

नज़र नज़र में उतरना कमाल होता है
नफ़स नफ़स में बिखरना कमाल होता है
बुलंदियों पे पहुँचना कोई कमाल नहीं
बुलंदियों पे ठहरना कमाल होता है

जगजितसिंग यांना हा शेर तंतोतंत लागू पडतो. ते शिखरावर पोहोचलेच नाही, तर ते तेथे टिकून राहिले. ती जागा कोणीही घेऊ शकलं नाही.

## अखेरचे दिवस...

जगजितसिंग 24 जानेवारी 1998 रोजी लुधियानात आपले मित्र अशोक भल्ला यांच्या मुलाच्या लग्नाला आले होते. लग्नसोहळ्यात त्यांचे चाहते कमी नव्हते. त्यांना भेटण्यासाठी अनेकांची धडपड सुरू होती. त्यांचा ऑटोग्राफ घेण्यासाठी चढाओढ लागली होती. ते हसत हसत त्यांना ऑटोग्राफ देत होते. मात्र, अचानक त्यांच्या हसऱ्या चेहऱ्यावर गांभीर्याच्या छटा उमटल्या. ते सारखे एक हात आपल्या छातीवर ठेवत होते. अखेरीस तेथेच ते मटकन बसले. अशोक भल्ला

यांनी तातडीने त्यांना लुधियानातल्या क्रिश्चियन मेडिकल कॉलेजमध्ये दाखल केले. रक्तदाब खूपच वाढला होता. चित्रा तातडीने मुंबईहून लुधियानाला रवाना झाल्या. जगजित यांना शुद्धीवर आलेले पाहिल्यानंतर त्यांचा जीव भांड्यात पडला. जगजितसिंग दोन दिवस आयसीयूमध्ये होते. हृदयविकाराचा तो हलकासा धक्का होता. ही बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि संपूर्ण देश त्यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करीत होता. दोन दिवसांनंतर त्यांना दिल्लीतील एस्कॉर्ट्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांचा 8 फेब्रुवारीला वाढदिवस होता. डॉक्टरांनी त्यांना काही दिवसांची मुभा दिली. वाढदिवसाची पार्टी सेलिब्रेट केल्यानंतर त्यांना पुन्हा हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. यथावकाश हॉस्पिटलमधून सुट्टी मिळाली, पण डॉक्टरांनी त्यांना काही अटींवर ही सुटी दिली. त्या म्हणजे यापुढे मद्यपान, सिगारेट संपूर्णपणे बंद करायचे. विमानप्रवास टाळायचा आणि पूर्णपणे विश्रांती घ्यायची. जगजितसिंग यांनी या अटी मान्य करीत मुंबईला जाण्याऐवजी डेहराडूनला विश्रांतीसाठी गेले. तेथे त्यांचे घनिष्ठ मित्र वैद्य बालंदू प्रकाश राहतात.

त्यांनी बालेंदूंना कळवले, की 'वैद्यराज, मी येतोय. तू करणार ना माझी खातीरदारी?'

बालेंदू म्हणाले, "हो, का नाही.."

त्यांच्या सेवेची जबाबदारी वैद्य बालेंदू यांनी स्वीकारली. जगजितसिंग यांनी तेथे तीन आठवडे विश्रांती घेतली. जगजितसिंग ठणठणीत होऊनच मुंबईला परतले. दिवसामागून दिवस सरले. जगजितसिंग विसरले, की कधी हृदयविकाराचा झटकाही आला होता. त्यांचे देश-विदेश दौरे पुन्हा सुरू झाले. संगीत मैफली पुन्हा झडू लागल्या. पण सगळे काही नॉर्मल नव्हते. नियतीचा राग अजून शांत झालेला नव्हता.

विवेकच्या मृत्यूनंतर मुलगी मोनिका चित्रा यांचा आधार झाली होती. पण मोनिकाचं आयुष्यही म्हणावं तितकं सुखी नव्हतं. तिच्या आयुष्यातही अनेक वेदनांचे काटे होते. ती आपल्या वेदना विसरून आईवडिलांच्या वृद्धत्वाची काठी बनली. मात्र, तिचा सहवासही या वृद्ध

दाम्पत्याच्या नशिबी नव्हता. एके दिवशी 2009 मध्ये सकाळी मोनिकाच्या मृत्यूने जगजितसिंग आणि चित्रा यांचं आयुष्य पुन्हा अंधकारात ढकललं गेलं. मोनिकाने आत्महत्या केली होती. हा धक्का वृद्ध जगजितसिंग आणि चित्रा यांचं काळीज चिरणारा होता. विवेकनंतरचा एकमेव आधार म्हणून जिच्याकडे पाहिलं, तीच निराधार करून गेली. काही वेळानंतर जगजितसिंग यांना रक्ताच्या गुठळयांच्या आजारामुळे रुग्णालयात दाखल व्हावे लागले. कमला हिल रिसर्च हार्ट सेंटरमध्ये उपचार सुरू झाले. रक्त पातळ करण्याची औषधे सुरू झाली. कालांतराने 2010 वर्ष समीप आले. जगजितसिंग 70 व्या वाढदिवसानिमित्त संगीतप्रेमींना खास भेट देणार होते. पुन्हा नव्या कार्यक्रमांची सुरुवात झाली. त्यांनी ठरवलं, की 70 व्या वाढदिवसानिमित्त संगीतप्रेमींसाठी वर्षभरात 70 कार्यक्रम सादर करायचे. जगजितसिंग यांचं मन तरुण होतं. पण वय साथ देत नव्हतं. वर्षभरात 70 कार्यक्रम म्हणजे महिन्याला किमान सहा कार्यक्रम. पण नियतीला हे मान्य नव्हतं.

20 सप्टेंबर 2011 रोजी जगजितसिंग यांचा एक सुपरहिट कार्यक्रम डेहराडूनला झाला. पण हा आयुष्यातला अखेरचा कार्यक्रम असेल याची कोणालाही कल्पना नव्हती. मात्र, या कार्यक्रमाने संगीतप्रेमींच्या डोळे पाणावले. कारण जगजितसिंग यांना विवेकची प्रचंड आठवण आली. यामागचे कारण म्हणजे विवेकनंतर मोनिकाचे जाणे... त्यातच हृदयविकाराने ते कमालीचे भावनिक झाले होते. आज विवेक असता तर किती आधार असता, हा विचार त्यांच्या मनात शिवला नसेल तरच नवल... कारण या वेळी गझलही तशीच होती..

चिठ्ठी ना कोई संदेस
जाने वो कौन सा देश
जहाँ तुम चले गए
तुम्हें ढुंढ रहा है प्यार
हम कैसे करें इकरार
के हाँ तुम चले गए

त्याच्या पुढच्याच दिवशी 21 सप्टेंबर 2011 रोजी जगजितसिंग मुंबईत आले. 23 सप्टेंबर रोजी पाकिस्तानचे प्रसिद्ध गझलगायक गुलाम अली यांच्यासोबत मुंबईत त्यांचा कार्यक्रम होता. 22 सप्टेंबर रोजी रात्री त्यांनी थोडा रियाझ केला आणि झोपायला गेले. काही वेळच झाला नाही, तर त्यांना अस्वस्थ वाटू लागले. चित्रा यांना वाटले, पोट दुखत असेल. म्हणून त्यांनी एक टॅब्लेट दिली. जगजित यांनी टॅब्लेट घेऊन बिछान्यावर अंग टाकलं. पण आराम मिळाला नाही. या वेळी कोणताही आवाज न आल्याने चित्रा त्यांना पाहायला गेल्या. बघतात तर काय, जगजितसिंग यांची हालचाल काहीशी मंदावलेली होती. चित्रा त्यांच्या जवळ आल्या, तर जगजितसिंग त्यांना म्हणाले, माझं डोकं फाटतंय जणू. घाबरलेल्या चित्राने तातडीने नातू अरमान (मोनिकाचा मुलगा) आणि त्याच्या मित्रांच्या मदतीने मध्यरात्री लीलावती हॉस्पिटलमध्ये दाखल केले. बराच वेळ तर डॉक्टरच नव्हते. डॉक्टर आले तेव्हा त्यांना ब्रेन हॅमरेज झाला. उपचार सुरू झाले, पण जगजितसिंग कोमात गेले. दिवसांमागून दिवस चालले, 18 दिवस झाले, पण जगजितसिंग कोमातून बाहेर आलेच नाहीत. इथे चित्रा यांची अवस्था काय झाली असेल, याची कल्पना न केलेलीच बरी. कारण मुलगा विवेक, नंतर मुलगी मोनिका यांच्यानंतर त्यांना जगजितसिंग यांचाच तर आधार होता. पण डॉक्टर दिलासा देत होते. याच हॉस्पिटलमधील एक महिला तीन वर्षांनंतर कोमातून बाहेर आल्याचे त्यांना सांगण्यात आले. नंतर एक बातमी वाचण्यात आली, की कोणी मरिनड्राइव्हवरील माणूस 11 वर्षांनी कोमातून बाहेर आला. त्यामुळे त्यांना एक विश्वास वाटू लागला, की असंच आपल्याही बाबतीत घडेल. पण आशेचा फुगा फुटला आणि जगजितसिंग यांनी अखेर या जगाचा निरोप घेतला.

गझलविश्व समृद्ध करणाऱ्या एका गायकाचा प्रवास संपला होता. मात्र त्यांच्या गायकीचा नंदादीप अजूनही तेवत आहे, त्यांच्या आठवणींतून, गीतांतून...

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. महेश पठाडे यांचं ई साहित्यवरचं हे पहिलंच पुस्तक.**

तसे महेश हे एक व्यावसायिक लेखक आहेतच. महाराष्ट्र टाईम्स मध्ये ते वरीष्ठ उपसंपादक म्हणून काम पहातात. त्या निमित्ताने त्यांचे वाचनही प्रचंड आणि विविध आहे. तसेच त्यांचे लेखनही नियमित आणि विविधांगी आहे. त्यांचे ब्लॉगलेखनही असते. पण त्यांचे पहिले पुस्तक प्रकाशित करण्याचा मान ई साहित्य ला मिळाला याचा आम्हाला अभिमान आहे. तसे त्यांना प्रकाशक सहज मिळू सकतात. पण इतर असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे.

ई साहित्य प्रतिष्ठान

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान